सिंगापूर

# ऋतुगंध

वर्ष ९ अंक 3

# वर्षा



## अयं निजः परो वेति गणना लघुचेतसाम् ।
## उदारचरितानां तु वसुधैव कुटुम्बकम् ॥



# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| संपादकीय | ऋतुगंध समिती | ५ |
| महाराष्ट्र मंडळ सिंगापूर - वार्ता | | ८ |
| वसुधैव कुटुम्बकम् | गिरीश टिळक | १२ |
| वसुधैव कुटुम्बकम् - कविता | युगंधरा परब | १५ |
| जगा आणि जगू द्या | आरती शुक्ल | १६ |
| जो जे वांछील तो ते लाहो | रमा कुलकर्णी | १८ |
| तंजावूर पेंटिंग | मुग्धा पटवर्धन | २० |
| प्राचीन भारतीय संस्कृतीची जगव्याप्ती - भाग ५ | निरंजन भाटे | २१ |
| वसुधे तुझ्याचसाठी | मृणाल देशपांडे | २४ |
| यदा यदा हि... | विनय सावंत | २६ |
| ग्लोबल कुटुंब | मेघना असेरकर | २९ |
| पुस्तक परिचय - गॉन गर्ल | निरंजन नगरकर | ३१ |
| ऋणानुबंध | विश्वास वैद्य | ३४ |
| सर्वेऽपि सुखिनः सन्तु | गीता पटवर्धन | ३७ |
| पावसाची आली सर | वृंदा टिळक | ३९ |
| सकार हवा, नकार नको | मोहना कारखानीस | ४० |
| SG50 | सतीश लेले | ४३ |
| गाणे जीवनगाणे: मुलाखत - संजीव अभ्यंकर | ऋतुगंध समिती | ४५ |
| असे देखिले सिंगापूर | शैलजा सोनगावकर | ६० |
| परिवार वार्ता | | ६२ |





Celebration
OFFER
20 60 20
SCHEME AVAILABLE*
KANAKIA
PLATINO
AT KANAKIA LEVELS
SPACIOUS 2, 3 & 4 BHK APARTMENTS
MALAD (EAST), MUMBAI
India's first Snow Spa | Turkish Hamam | Aqua Zone with Floating Clubhouse | 5 Senses Garden | Designed by International Architect, Daniel Hsia | Landscape Garden Designed by Tectonix,Thailand
CALL : +91 9223121169 / +91 9819093777
E-mail : nrisales@kanakia.com
*Offer valid till 31st July 2015

## संपादकीय

नमस्कार, मंडळी! २०१५ चा "ऋतुगंध वर्षा" आपल्या हाती देताना आम्हांला खूप आनंद होतो आहे. तुम्हांला आठवत असेलच की २०१५ ऋतुगंधचे अंक हे संस्कृत सुभाषितांवर आधारित असणार आहेत.  ह्या अंकासाठी आपली केंद्रकल्पना आहे हे सुपरिचित सुभाषित -

अयं निज: परो वेति गणना लघुचेतसाम्।
उदारचरितानां तु वसुधैव कुटुम्बकम्॥

"वसुधैव कुटुम्बकम्" हा व्यापक विचार आपल्याकडे फार पूर्वीपासून आहे. समस्त पृथ्वीला आपलं कुटुंब मानायचं म्हणजे नेमकं काय? त्यातलं नेमकं आपल्या आवाक्यात काय आहे आणि आपण त्यातलं किती करतो हा विचार आवश्यक आहे, नेहेमीच होता. सद्य युगात ह्याची जास्त गरज आहे आणि याचं कारण जग जवळ आलंय. एक अर्थव्यवस्था कोलमडली की तिचे परिणाम दूरवर जाणवतात. बहुतेक ठिकाणी आता विविध देश, धर्म, वंश, भाषांचे लोक एकत्र नांदताना दिसतात. त्यांना एकमेकांना सांभाळून घ्यावं लागतं, समजावून घ्यावं लागतं, मदत करावी लागते. आपला-परका याच्या पारंपरिक व्याख्या या नव्या जगात निकामी आहेत. विविध धर्म, प्रांत, भाषा, वंश यांची सरमिसळ असलेल्या आर्यावर्ताकडे या क्षेत्रात जागतिक नेतृत्वाची संधी आहे. भारतातलं सध्याचं चित्र फारसं आशादायक नसलं तरी आपल्या पहिल्या अंकाच्या केंद्रकल्पनेनुसार आशा ठेवणं काहीच गैर नाही.

म्हणून या अंकात "वसुधैव कुटुम्बकम्" चा मागोवा घेणारं साहित्य आम्ही तुमच्या भेटीला आणतो आहोत. काही वैचारिक लेख आहेत - या संकल्पनेच्या विकासाचा शोध घेणारे किंवा सिंगापुरात विश्वकुटुंब कसं वसलंय हे सांगणारे, काही आशेचा किरण दाखवणारे आणि काही कोरडे ओढणारे. कथा आहे, कविता आहेत, पुस्तक परीक्षण आहे. आपल्या प्राचीन संकृतीच्या जगव्याप्तीचा शोधही आपण चालू ठेवतो आहोत.



ह्या अंकाचं विशेष म्हणजे जगभर प्रवास करून आपल्या गायनानं रसिकांना मोहिनी घालणाऱ्या पं. संजीव अभ्यंकरांची मुलाखत! त्यांच्या अनुभवातून या संकल्पनेचा एक वेगळा चष्मा आपल्याला पाहायला मिळेल.

वर्षा अंक आहे - त्यामुळे कांदाभजी आणि गरमागरम चहा घेत अंक जरूर वाचा आणि प्रतिक्रियाही नक्की कळवा. म्हणजे आम्हांला पुढचे अंक आणखी नेटके करता येतील.

आपली,<br>
ऋतुगंध २०१५ समिती

## ऋतुगंध २०१५ समिती

नीतीन मोरे - संपादक<br>
जुई चितळे - सहसंपादक<br>
राजश्री लेले - जनसंपर्क<br>
अस्मिता तडवळकर - ऋतुगंध, ममंसिं संयोजक<br>
प्राची वर्तक - मुखपृष्ठ, मांडणी व सजावट<br>
वेदश्री जठार - मांडणी व सजावट<br>
यशोवर्धन जोशी - साहित्य संयोजक

*** लेखांत व्यक्त झालेली मते ही पूर्णपणे संबंधित लेखकांची आहेत. महाराष्ट्र मंडळ सिंगापूर तसेच संपादक समिती त्यांच्याशी सहमत असेलच असे नाही.



# महाराष्ट्र मंडळ सिंगापूर – वार्ता

## नाटक निवडचाचणी वृत्तांत

मराठी माणूस आणि नाटक यांचं अतूट नातं आहे. परदेशात गेल्यावरही हे नातं जपलं जातं. महाराष्ट्र मंडळ सिंगापूरही दरवर्षी उत्तम नाटक सादर करते. अनेक गुणी कलाकार आणि दिग्दर्शकांनी आत्तापर्यंत दरवेळी चढत्या क्रमाने उत्तम नाटकं सादर केली आहेत.



ह्यावर्षी ही एक दोन अंकी नाटक आणि एक बालनाट्य सादर करण्याचा महाराष्ट्र मंडळाचा मानस आहे. त्यासाठी १६ मे २०१५ रोजी नाटकासाठी कलाकार निवडचाचणीचे आयोजन ग्लोबल इंडियन शाळेत करण्यात आले होते. बालनाट्यासाठी परीक्षक म्हणून दिग्दर्शक रमा कुलकर्णी होत्या तर दोन अंकी नाटकासाठी दिग्दर्शक अमित जोशी परीक्षक होते.

कोणतंही नाटक यशस्वी होण्यासाठी पडद्यावरील कलाकारांबरोबर पडद्यामागील कलाकारही तेवढेच महत्त्वाचे असतात. त्याच्यासाठी सुद्धा आपलं नाव नोंदवण्याची ही एक संधी होती. निवडचाचणीला उत्तम प्रतिसाद मिळाला. २५च्या वर बालकलाकार आणि २५ मोठ्या कलाकारांनी निवडचाचणी मध्ये भाग घेतला.

*- राजश्री लेले*

## बाल चित्रकला कार्यशाळा

आपल्या छोट्या दोस्तांसाठी एखादा कार्यक्रम आयोजित करायला मिळणे ही मंडळासाठी एक पर्वणी असते. मुलांचा उत्साह, गोडवा आणि निर्मितीक्षमता भारून टाकणारी असते. मुलांच्या सृजनशीलतेला साजेसा एक विषय घेऊन आम्ही १७ मे २०१५ रोजी ग्लोबल इंडियन शाळेत एक कार्यशाळा घेतली. कलापदवीप्राप्त कलाशिक्षिका आणि महाराष्ट्र मंडळाची सभासद चारू आफळे हिने या कार्यशाळेची संकल्पना आणि नियोजन केले. हाताच्या आणि पायाच्या बाह्यरेषांमधून वेगवेगळ्या पक्षी प्राण्यांचे आकार शोधून काढायचे आणि रेखायचे अशी संकल्पना होती. या कार्यशाळेला भरघोस प्रतिसाद मिळाला. २५ मुलांनी या कार्यशाळेत भाग घेतला. महाराष्ट्र मंडळातर्फे त्यांना चित्रकलेचे सर्व सामान आणि खाऊ देण्यात आला.





*- नलिनी थिटे*

## इन्टरिम ऑडिट

आपलं महाराष्ट्र मंडळ ही जरी एक non-profit संस्था असली तरीही आपल्याला मंडळाच्या जमाखर्चाचा ताळेबंद ठेवावा लागतो आणि आपण जागरूकपणे तो ठेवतोही. नुकतंच आपलं

इन्टरिम ऑडिट पार पडलं. आपले ऑडिटर्स अमृत जोशी व अमोल करमळकर यांनी, खजिनदार स्मिता अंबिके व सहाय्यक सचिव विशाल पेंढारकर यांच्या सहाय्याने ऑडिटचं कामकाज सुरळीतपणे पार पाडलं.

*- मंजिरी कदम*

## वार्षिक सहल








ममंसिं ची वार्षिक सहल ११-१२ जुलैला सिंगापूरहून अडीच तासांच्या अंतरावरील क्लुआंग, मलेशिया येथील UK Agro Farm Resort येथे आयोजित करण्यात आली होती. लहान-मोठे असे ६६ सभासद ह्यात सहभागी झाले. 'Kampong life' चा अनुभव देणाऱ्या ह्या सुंदर, हिरव्यागार आणि ११० एकर एवढया विस्तीर्ण परिसरात लगोरी, फुटबॉल यासारखे खेळ तर रंगलेच, पण '3-Minute Sheep Catching Challenge', Archery, Mouth Darts अशा वेगळ्या खेळांचा आनंदही सभासदांनी लुटला. तेथील टूरमध्ये शेळ्या, टर्की, शहामृग यांना खायला देणे, आधुनिक पद्धतीने शेळ्यांपासून दुग्धोत्पादन कसे करतात ते पहाणे, थंडगार दूध आणि शहाळ्यांचा आस्वाद घेणे या

सगळ्याची मजा सर्वांनी घेतली. मावळणारा नयनरम्य सूर्य आणि पिसारा फुलवलेला मोर जणू काही सिंगापूरवासींसाठी निसर्गाची भेट होऊन सामोरे आले. विशेष म्हणजे चांदण्या रात्री सगळ्यांनी मिळून सुंदर सुंदर आकाशकंदील हवेत सोडले, Housie आणि भेंड्यांचा कार्यक्रमही केला. पुष्कळ फोटो, नवीन मित्र आणि एक आल्हाददायी अनुभव घेऊन ममंसिं सभासद घरी परतले.

- *अस्मिता तडवळकर*

## शब्द-स्वर निवडचाचणी वृत्तांत

'शब्दगंध' हा स्वरचित मराठी कवितांना वाहिलेला, गेली ११ वर्ष अव्याहत सुरू असणारा महाराष्ट्र मंडळ (सिंगापूर) चा मासिक उपक्रम आहे. त्याचप्रमाणे, 'स्वरगंध' हा आपला २००९ पासून गीत व संगीतावर आधारित उपक्रम आहे. शब्दगंधींच्या निवडक कवितांना स्वरगंधींनी चाल लावून या कवितांचे वाद्यवृन्दासहित सादरीकरण गणेशोत्सवातील एका दिवशी करायचे ठरवले आहे.

यासाठी सभासदांकडून कविता मागवण्यात आल्या. या आणि वर्षभरातील इतर कार्यक्रमांसाठी गायक, वादक आणि निवेदकांची चाचणी २८ जून २०१५ ला ग्लोबल इंडियन शाळेत घेण्यात आली. गायक व वादकांसाठी श्री रवींद्र परचुरे व श्री योगेश गोंधळेकर हे परीक्षक होते. निवेदकांचे परीक्षण सौ वृंदा टिळक व सौ राजश्री लेले यांनी केले. ८ गायक व ५ निवेदाकांनी ह्या निवडचाचणी मध्ये भाग घेतला.

- *अस्मिता तडवळकर*

- आगामी कार्यक्रम
- ऑगस्ट - SG50 Walk, पं. कैवल्यकुमार यांचा कार्यक्रम, विविध गुणदर्शन निवडचाचणी
- सप्टेंबर - गणेशोत्सव



**शब्द - स्वर चाचणी**च्या दरम्यान तिथल्या उत्साहाला चपखल दाद देणारी कविता सुगम काळे यांच्या उत्स्फूर्त लेखणीतून उतरली, ती इथे खास सादर करतो आहोत!

(चाल: एका तळ्यात होती)

एके दिसी दुपारी शाळेत भर उन्हात
होती चिकार गर्दी बेफाट चिवचिवाट

तेथे जमून गाती गंधर्व भावगीते
तबल्यावरी विहरती लयबद्ध कुशल बोटे

तालात शब्द करती पदनर्तने झकास
सम येत असता माना डोलून जाती खास

रसिकांत होई कल्ला ऐकून उंच तान
गवई बुडून जाई स्वरगंगेत बेभान

उरला नसे हिशेब स्थल काल बंधनात
बेहोश शब्द झाले धुंदी चढे क्षणात

स्वरमंडले रचिती जो उत्सव सुरेल खासा
आनंदडोह भरता गोडी चढेल न्यासा

गीते दुपारभर ती ऐकून धन्य होत
अश्राप लेखणीला जुंपूनिया कामात

एके दिशी दुपारी शाळेत भर उन्हात
होती चिकार गर्दी बेफाट चिवचिवाट

*- सुगम काळे*



# वसुधैव कुटुम्बकम्

बऱ्याच विचारवंतांकडून असे ऐकायला मिळते की मिसाइल्स आणि आंतरजालाच्या ह्या आधुनिक जमान्यात 'अंतर' हे परिमाण नष्ट झाले आहे. राष्ट्र, धर्म ह्या संकल्पना कालबाह्य झाल्या असून विश्वएकता हाच विचार स्फूर्तिदायक व अनुकरणीय आहे. हे खरंच आहे. तथापि वैश्विक विचार हा आधुनिक चिंतकांनीच प्रथमतः दिला आहे असे मात्र नाही. फार फार पूर्वी म्हणजे इतिहासालाही अज्ञात असलेल्या कालखंडातील ऋषीमुनींनी केलेल्या गंभीर चिंतनातून ऐक्य व विश्व कल्याणाचा विचार विकसित झाला. शतकानुशतकांची आपली एक प्रार्थना आहे -

"सर्वे भवन्तु सुखिनः। सर्वे सन्तु निरामयाः।

सर्वे भद्राणि पश्यन्तु। मा कश्चित् दुःखभाग्भवेत्॥ [ऋग्वेद]

केवळ मानव जातच नव्हे तर सर्व जीवित सुखी असावेत; कुणीही दुःखी असू नये अशा सर्वांच्या भल्याची मागणी आपण करतो. आधुनिक विचारवंतांची वैचारिक झेप, "जास्तीत जास्त लोकांचे जास्तीत जास्त भले" येथ पर्यंतच गेली. ह्या पलीकडे नाही. उपनिषद कालखंडापासून ते आजच्या काळापर्यंत आपण नेहमीच विशाल, भव्य, जगद्व्यापी विचार करत आलो आहोत.

अयं निज: परो वेति गणना लघुचेतसाम् । उदारचरितानां तु वसुधैव कुटुम्बकम् ॥

[महाउपनिषद ६-७२]

हा माझा, तो परका असा भेदभाव केवळ कोत्या मनोवृत्तीचे लोक करतात. विशाल दृष्टीकोन असलेले मात्र, सकळ पृथ्वी हे माझे कुटुंबच आहे असे मानतात. संत शिरोमणी ज्ञानेश्वर व समर्थ रामदास ह्यांनी केवळ भारतातच प्रवास केला. भारताबाहेर नाही. तुकारामांनी फार फार तर देहू ते पंढरपूर एवढाच. तरी त्यांचा दृष्टीकोन आकाशाएवढा कसा झाला? समर्थ रामदासस्वामी लहान असताना एकदा लपून बसले, काही केल्या सापडेनात. अखेर सापडले. "काय करीत होतास" असे विचारल्यावर "आई, चिंता करितो विश्वाची" असे उत्तर दिले होते..



"हे विश्वचि माझे घर। ऐसी मति जयाची स्थिर। किंबहुना चराचर। आपण जाहला।।" असे संत ज्ञानेश्वर माऊलींनी म्हणून ठेवले आहे.

भारतात उदयास आलेली विचारधारा अखंडितपणे हजारो वर्षे जिवंत आहे. ह्या विचारात निसर्गाचे शोषण नाही तर दोहन होते. प्राण्यांची, जमिनीची, वृक्षांचीच काय दगडाचीही पूजा होते. अर्थ [सांपत्तिक संचय] व काम [भौतिक सुख] हे धर्म व मोक्ष ह्याच्या मर्यादेत असावे अशी शिकवण आहे.

संपूर्ण मानवजात कुटुंबातील व्यक्तींप्रमाणे अलिखित नियमांनी बांधलेली आहे. किंबहुना अंगांगी, म्हणजे एक शरीर - अनेक अवयव असा संबंध आहे. कुणी अवयव श्रेष्ठ नाही की कनिष्ठ. प्रत्येकाचे काम ठरलेले असते. एक दुखावला तर दुसऱ्याला त्रास होतो. हिंदू तत्त्वज्ञानाचा असा हा "अविभक्तं विभक्तेषु" एकात्म विचार आहे. विविधतेमध्ये एकात्मता, एकरसता हे आपले वैशिष्ट्य आहे. विविधतेतून येणारी भिन्न भिन्न वैशिष्ट्ये नष्ट न करता त्यांचे जतन करणे व त्यांच्यात समानता नव्हे तर सामंजस्य, समन्वय निर्माण करणे ह्यावर आपला विश्वास आहे.

आपल्या संस्कृतीची हिमालयासम उन्नत दृष्टी, "एकं सद् विप्रा: बहुदा वदन्ति। [ऋग्वेद १-१६४-४६ ]" ह्या वचनाद्वारे अभिव्यक्त झालेली आहे. तेथपर्यंत पोहोचण्याची महत्त्वाकांक्षा जगातील कुठल्याही मत-मतांतराने केलेली नाही. हा भाव व्यक्त करण्यासाठी सहिष्णुता असा शब्दप्रयोग होतो. पण तो एका अर्थी हलक्या प्रतीचा आहे. कारण त्यामध्ये 'अहं'चा भाव आहे व इतरांविषयी 'तुमचे विचार सहन करतो' असा आहे. 'तुमच्या विचारांचाही आदर करतो' हे सहिष्णुतेच्या अधिक उंचीचे आहे.

हा विषय केवळ तत्त्वज्ञानापुरता मर्यादित नसून आपला व्यवहारही तसाच राहिला आहे. पारशी, ज्यू लोकांना आपण सामावून घेतले. जगातील कुठलाही भूभाग बळकावून बळजबरीने धर्मांतर केले नाही. तर आपल्या पूर्वजांनी "कृण्वन्तो विश्वं आर्यं" व "स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन पृथिव्यां सर्वमानवाः [मनुस्मृतिः २-२०]" ह्या ध्येयाने आपला विचार विश्वभर पसरविला.

आज विश्वभर आपल्या संस्कृतीसंबंधी जिज्ञासा, उत्सुकता आहे. आपल्या सर्वसमावेशक, वैज्ञानिक तरीही आध्यात्मिक दृष्टीकोनाच्या माध्यमातूनच जगास सतावणाऱ्या सर्व समस्यांचे समाधान होऊ शकेल अशी आशा अनेक राष्ट्रांना आहे. आपण, विशेषतः विदेशस्थ भारतीयांनी, श्रेष्ठ हिंदू संस्कृतीचा अभिमान हृदयस्थ जागृत ठेवणे, त्याचे प्रकटीकरण आपल्या व्यवहारातून होणे व त्याचे संरक्षण करण्यास सिध्द असणे हे आपले कर्तव्य मानले पाहिजे.

प्रस्तुत लेख म्हणजे आपल्यासारख्या सूज्ञ वाचकांना काही सांगणे हा भाव नाही तर माझ्या विचारांना सुदृढ करणे असा प्रयत्न आहे.

*- गिरीश टिळक*



# वसुधैव कुटुम्बकम्

वसुधैव कुटुम्बकम्
एकच गजर सभोवतम्
आणिले जग जवळी ज्यांनी
व्हॉट्स अप आणि फ़ेसबुकम्

गरज न उरली भेटीची नित
भेट भिंतीची परस्परम्
नित्य भेट होवूनही का रे
अपूर्ण मन अतृप्तम्

*- युगंधरा परब*



## जगा आणि जगू द्या

"वसुधैव कुटुंबकम्" याचा शब्दश: अर्थ "या पृथ्वीवरचे जग हे माझे कुटुंबच आहे." भारतातील संतांनीही "हे विश्वचि माझे घर" असे म्हंटले आहे.

ही संकल्पना आपल्या घरापासूनच सुरु होते. घर म्हटले की घरात आपली जवळची माणसं असतात. आपण एकमेकांना धरुन राहतो, काळजी घेतो. यांत प्रेमाची, आपुलकीची भावना असते. थोडक्यात कुटुंबसंस्था टिकवण्यासाठी आपण झटतो. आता घरातल्या व्यक्तींच्या नंतर इतर नातेवाईक आणि मित्रमंडळी येतात. शेजारी पण आपल्या रोजच्या जीवनाचा भाग असतात. त्यांच्याशी एकोप्याने राहणे, मदत करणे यातूनही आनंद मिळतो. यांत जात कोणती किंवा धर्म कुठला असा अडथळा नसावा. एक उदाहरण म्हणजे त्यांच्याही सणवारात आपण उत्साहाने सहभागी झालो तर आपुलकी निर्माण होते.

यानंतर आपला भारत देश आहे त्याचा विचार करूया. आजच्या युगात भारतात ही संकल्पना प्रत्यक्षात रुजवणे फार आवश्यक आहे. भारतात अनेक धर्मांचे लोक आहेत. प्रत्येक धर्माची वेगवेगळी विचारधारा आहे. जात, धर्म या गोष्टींचा अडथळा प्रत्येक बाबतीत येतो आहे. आरक्षण या मुद्द्यामुळे जातीभेद वाढत चालला आहे. आज प्रत्येकाला स्वतंत्र प्रांत हवा आहे. महाराष्ट्रात स्वतंत्र विदर्भाची मागणी आहे तर आंध्रात तेलंगणा प्रांत वेगळा झालासुध्दा आहे. यासाठी लोकांची काहीही करायची तयारी आहे. हिंसेचा मार्ग तर आहेच. यातून काय मिळते आहे? सुखशांती नक्कीच नाही! निरपराध लोकांचे बळी जात आहेत. प्रत्येक राज्याचे छोटे तुकडे होऊन विभाजन होण्याची शक्यताही आहेच. म्हणूनच एकोप्याने राहणे व आपुलकीने संबंध चांगले करणे यांत निश्चितच राष्ट्राची प्रगती आहे. याच संकल्पनेने प्रेरित होऊन प्रत्येकाने विचार केला पाहिजे. तेव्हा पुढचा विचार म्हणजे शेजारची राष्ट्रे आणि बाकीचे देश. शेजारच्या राष्ट्रांशी संबंध आपुलकीचे असले म्हणजे त्यांच्याकडून मदतीचा हात मिळतो तसेच आक्रमणाची शक्यता कमी होते. त्यांनाही मदत करता येते. दोन्ही देशातील पर्यटन वाढल्यानंतर देशातील अर्थव्यवस्था चांगली राहते. थोडक्यात बाहेरुन असणारे धोके नसताना राष्ट्राच्या प्रगतीकडे लक्ष देता येते.

आपण जसे कुटुंबाच्या कल्याणासाठी झटतो तसेच आपल्या देशासाठी झटलो तर संरक्षणासाठी लागणारा पैसा अन्य चांगल्या कामांसाठी वापरता येईल. असेच सगळ्या विश्वाबद्दलही म्हणता येईल. प्रत्येक राष्ट्राने “जगा आणि जगू द्या” या मूलमंत्राप्रमाणे धोरण ठेवले तर कोणाचेच नुकसान होणार नाही उलट प्रगतीच होईल.

बलवान देश नेहमीच गरीब देशातील लोकांचे, त्यांच्या नैसर्गिक संपत्तीचे शोषण करत असतात. त्यांना त्या देशातील लोकांचे काय होईल याची पर्वा नसते. काही अतिरेकी संघटनांनी फैलावलेला दहशतवाद ही तर जगात मोठी समस्या आहे ज्यातून फक्त विनाशच होऊ शकतो. सध्या एका अतिरेकी संघटनेने वाट्टेल तशा कत्तली करून इराक व सिरियाचा बराच प्रदेश जिंकून घेतला आहे. अशाच पध्दतीने त्यांचा जग जिंकून घ्यायचा हेतू आहे. प्रश्न असा आहे की अशा कत्तली करुन काय मिळणार आहे? पूर्ण जगातील वातावरण अस्थिर असणार आहे आणि कुठल्याच देशाची प्रगती होणार नाही. त्यापेक्षा प्रत्येक व्यक्तीने जर विश्वबंधुत्वाची भावना ठेवली आणि आजूबाजूच्या सगळ्यांना सुखासमाधानाने जगण्याचा पूर्ण हक्क आहे असे मानले आणि गुण्यागोविंदाने रहायचे ठरवले तर शांतता नांदेल. दहशतवादातून सगळ्यांची सुटका होईल.

सिंगापूर - जिथे आपण राहतो - तो एक लहानसा देश आहे पण इथे अनेक जातीधर्मांचे लोक आहेत. त्यांच्या भाषा वेगळ्या आहेत, पण प्रत्येक नागरिक 'सिंगापूर हा माझा देश आहे' असे मानूनच गुण्यागोविंदाने रहातो आहे. अनेक परदेशी लोकांची संख्या दरवर्षी वाढते आहे. त्या सगळ्यांशी इथे जुळवून घेतले जाते म्हणूनच विश्वबंधुत्वाची कल्पना मानणारे सिंगापूर हे मूर्तिमंत उदहारण आहे असे म्हणता येईल. असेच प्रयत्न जागतिक पातळीवर झाले तर प्रत्येकाचे जीवन सुखी होईल, नाही का?

*- आरती शुक्ल*



# जो जे वांछील तो ते लाहो

‘हा आपला तर तो परका असा आप-पर दुजाभाव मनात न बाळगता सर्व विश्व हे माझे कुटुंब आहे असे जो मानतो तो श्रेष्ट’ असा विचार ह्या आपल्या उपनिषदांमध्ये उत्तम पुरुषाच्या लक्षणात सांगितलेला आढळतो.

आज सुद्धा ज्या विचाराची अत्यंत गरज आहे आणि अभाव आहे तो हा विचार आपल्या उपनिषदात हजारो वर्षांपूर्वी सांगून ठेवला आहे. हेच चिरंतन साहित्याचे लक्षण आहे. आपल्या ह्या साहित्यिक ठेव्याचा आपल्याला सार्थ अभिमान वाटावा असे हे वैचारिक धन आहे.

वैश्विक बंधुत्व ही आज काळाची गरज आहे. आज सर्वत्र क्रोध, मत्सर, द्वेष ह्या मानवजातीच्या शत्रूंनी आपल्याला ग्रासलेले दिसते. त्यावर ह्या विचाराच्या अंमलबजावणीची नितांत आवश्यकता आहे. माणूस माणसापासून दुरावत चालला आहे. जात, धर्म, पंथ, वर्ण ह्यावर आधारित भिंती माणसाला माणसापासून विभागत असताना विश्व हेच कुटुंब ह्यासारखा सुंदर विचार माणसाला एका रेशमबंधाने बांधू शकतो.

“वसुधैव कुटुम्बकम्” अर्थातच “हे विश्वचि माझे घर…” सर्व वसुधेला आपले मानण्याची उदात्त संकल्पना. एक भूगोलाची शिक्षिका ह्या नात्याने मला तर ही अगदी मनापासून पटलेली आणि आवडलेली अशी समजूत आहे. आपण जर आल्फ्रेड वेग्नेर च्या 'Continental Drift Theory' कडे जरा ह्या दृष्टीकोनातून पाहिले तर कळेल की मुळात हे जग एकाच अखंड भूखंडाने व्यापले होते. 'Pangea' नामक एक विशाल भूखंड कालांतराने प्रथम दोन व नंतर अनेक सद्य विस्थापित ७ खंडांमध्ये विभागला गेला. कल्पना करून बघा जर हा 'Pangea' विभागलाच गेला नसता तर? ह्या पृथ्वीतलावर एकाच खंडावर ही मानवजाती एकत्र नांदली असती. मग हा आशियाई, तो युरोपिअन, ती आफ्रिकन अन हा अमेरिकन हा भेदभावच उरला नसता, नाही का? ह्या 'Pangean' संस्कृतीच्या 'अवघ्या एक रंगात' हे विश्व रंगले असते.



भौगोलिकदृष्ट्या आपण जरी विभिन्न नैसर्गिक परिस्थितीत राहत असलो तरी ज्याप्रमाणे सर्व जीवनाचा अन् उर्जेचा स्रोत सूर्य आपली किरणे कोणाचा कोणता वर्ण आहे हे न पाहता सर्वत्र पोचवत असतो, वारा कोणत्याही भेदभावाला न जुमानता वाहत असतो, पाऊस उच्च-नीच न पाहता पडत असतो, एखाद्या वृक्षाची सावली त्याखाली बसलेल्या प्रत्येक वाटसरूला समान वागणूक देत असते, त्याप्रमाणे आपणही प्रत्येक व्यक्तीशी आपला व्यवहार ह्या मानवनिर्मित फरकांना न मानून करण्याचा कसोशीने प्रयत्न केला पाहिजे तरच आपण खऱ्या अर्थाने विश्वबंधुत्व अंगिकारले असे म्हणता येईल.

मुळात सर्व मानवजात ही एक आहे हा विचार ज्ञानेश्वरांनी ७५० वर्षांपूर्वी आपल्या पसायदानातून 'आता विश्वात्मके देवे' असा उच्चार करून परत मांडलेला दिसतो. माझ्या जातीपुरता, समाजापुरता, राज्यापुरता किंबहुना देश अथवा खंडापुरता त्यांचा विचार मर्यादित न राहता संपूर्ण विश्वातील अखिल मानवजातीचे कल्याण व्हावे हा केवढा उदात्त विचार आपल्या पसायदानातून ज्ञानेश्वरांनी प्रकट केला आहे. अन् 'जो जे वांछील तो ते लाहो' अशी अतिसुंदर भावना व्यक्त करून आपल्या मायबोलीला "अमृताशी पण पैजा जिंकवून" देण्याइतकी ताकदवान बनवली आहे. अगदी अलीकडच्या काळात स्वामी विवेकानंदांनी ह्याचाच उच्चार करून सर्व जगाला विश्वबंधुत्वाचा संदेश दिलेला आपण जाणतोच.

ज्याप्रमाणे एका कुटुंबात एकत्र नांदणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे स्वतंत्र व्यक्तिमत्व असते, आवड-निवड असते आणि आपण त्याचा आदर राखतो, त्याप्रमाणेच ह्या वैश्विक कुटुंबात नांदणाऱ्या प्रत्येक समाजाच्या संस्कृतीचा, राहण्याच्या पद्धतीचा, खाण्यापिण्याच्या पद्धतीचा, वेशभूषेचा आदर राखणे आपले कर्तव्य नाही का? असे झाले तरच आपण खऱ्या अर्थाने 'हे विश्वचि माझे घर' हे विधान सार्थ करू असे वाटते.

*- रमा कुलकर्णी*



# तंजावूर पेंटिंग




- मुग्धा पटवर्धन



## प्राचीन भारतीय संस्कृतीची जगव्याप्ती - भाग ५

मागील भागात आपण मलेशियातील भारतीय संस्कृतीचा प्रभाव पाहिला. आता आपण काल-प्रवासी इंडोनेशियामधील प्रवासाला सुरवात करूया.

इकडे इंडोनेशियामध्ये ख्रिस्त पश्चात दुसऱ्या शतकापासून भारतीय राज्य स्थापनेला सुरवात झाली. पल्लव घराण्यातील देववर्मन याने दुसऱ्या शतकात जावा बेटावरील राजकन्येशी विवाह करून जावा बेटावर 'शलाकानगर' (आजचे पान्देग्लांग) येथे आपले राज्य स्थापन केले. पुढे पल्लव राजवंशातीलच जयसिंहवर्मन याने ख्रिस्त पश्चात ३५८ च्या सुमारास स्थापन केलेले जावा बेटावरील तरुम (तारुम) नदीच्या काठावरील 'तारुमनगर' हे राज्य त्याच्याच वंशातील पूर्णवर्मन या त्याच्या पणतूने  उत्कर्षाच्या कळसाला पोहोचविले. भारतीय धरणशास्त्राचा वापर करून त्याने तरुम नदीचा प्रवाह बदलून शेतजमिनीला पाणी मिळण्याची व्यवस्था केली. पुढे सहाव्या शतकात या राज्याचे सुन्दा आणि गालू असे दोन भाग पडले.

आसाम, मगध आणि बंगालवर राज्य करणाऱ्या पाल घराण्यातील जयानास (जयांश?) या राजाने सहाव्या शतकात बलाढ्य आरमार आणि सैन्यासह इंडोनेशियाच्या सुमात्रा बेटावर स्वारी करून 'श्री-विजय' साम्राज्याची स्थापना केली. पाल राजवंशाने महायान बुद्धधर्माचा स्वीकार केला असल्याने साहजिकच "श्री-विजय" हे बौद्धधर्मी राज्य स्थापन केले. त्याने सुमात्रा बेटावरील छोटी छोटी राज्ये तसेच जावा बेटावरील तरुमनगर, सुन्दा तसेच गालू ही राज्ये  जिंकली. तसेच गंगानगर, पट्टणी (लंकासुख) या राज्यांना मांडलिक बनविले आणि संपूर्ण मलेशिया आणि इंडोनेशिया येथील सामुद्रधुनी आपल्या अधिपत्याखाली आणली.

याच वेळी सहाव्या आणि सातव्या शतकात सुमात्रा आणि बोर्निओ येथील ऑस्ट्रो-नेशियन (तैवान आणि फिलीपाइन्स येथील वंश) आणि हिंदू भारतीय अशा मिश्र 'चाम' वंशाच्या संपन्न व्यापारी राज्यकर्त्यांनी दक्षिण विएतनाममध्ये आपले 'चंपा' हे वसाहतवजा राज्य स्थापन केले. त्याचा इतिहास आपण मागील भागात बघितलाच.

दक्षिण-मध्य जावा बेटावर त्याचवेळी 'शैलेंद्र' हे बलशाली राज्य उदयास आले होते. इतिहासकारांच्या मते भारतीय कलिंग राजवंशातील राजांनी या राज्याची स्थापना केली होती आणि ते देखील महायान बौद्ध धर्माचेच अनुयायी होते. श्री विजय आणि शैलेंद्र साम्राज्यांनी एकमेकांशी मैत्रीपूर्ण व्यवहार आणि वैवाहिक संबंध स्थापित केले होते. शैलेंद्र राजांच्या काळात ख्रिस्तपूर्व आठव्या शतकात जावामधील 'बोरोबुदूर' या जगप्रसिद्ध बौद्ध स्तूप-समूहाची निर्मिती झाली.

भारत, मलेशियन आणि इंडोनेशियन द्वीपांवर निर्माण होणारे मसाले, सोने, रत्ने, शेतमाल आणि चीनमधून निर्यात होणारे रेशीम, इतर वस्तू, तसेच चीन, जपान, कोरिया आणि भारत, अरब देश, इजिप्त व रोमन साम्राज्य यांमध्ये समुद्री मार्गाने होणारी व्यापारी देवाण-घेवाण हा या सर्व राज्यांच्या अर्थव्यवस्थेचा कणा होता.

शैलेंद्र साम्राज्याने कंबोडियावर स्वारी करून काही काळ कंबोडियावर सुद्धा राज्य केले. पूर्व आणि दक्षिण जावा, बाली इत्यादी बेटांवर त्यावेळी काही हिंदू राज्यांचे अधिपत्य होते. नवव्या शतकात शैलेंद्र साम्राज्य काहीसे दुबळे झाल्यावर संजय राजवंशाच्या 'मातरम' या साम्राज्याने मध्य जावा आणि बाली बेटे यावर आपले वर्चस्व निर्माण केले.

"संजय" राजवंश हिंदुधर्मीय असल्यामूळे त्यांनी या सर्व प्रांतात हिंदू धर्माची स्थापना केली आणि मोठ्या प्रमाणावर शिव, विष्णू, गणेश आणि इतर हिंदू देवदेवतांच्या मंदिरांची उभारणी केली. त्यामध्ये योग्यकर्ता येथील 'प्रम्बानान' या जगप्रसिद्ध मंदिर-समूहाचा समावेश आहे. राजा लोकपाल, बातीलुंग महासंभू आणि दक्ष या राजांनी २४० प्रम्बानान मंदिरांचे निर्माण केले. त्यासाठी ओपाक नदीचा प्रवाहसुद्धा वळविण्यात आला. पुढे श्री-विजय साम्राज्याने पुन्हा एकदा आक्रमण करून हे मातरम साम्राज्य स्वत:च्या अधिपत्याखाली आणले.

त्याच वेळी भारतात चोल वंशाचा पराक्रमी सम्राट 'राजराजा चोल' (चोलन, चोझन) याने चालुक्य (आंध्र आणि कर्नाटक), पंड्या (दक्षिण तामिळनाडू), कलिंग (ओडिशा), चेर (केरळ) या सर्व

राज्यांचा पराभव करून दक्षिण व पूर्व भारतावर आपली सार्वभौम सत्ता स्थापन करण्यात यश मिळवले. त्याचबरोबर त्याने श्रीलंकेच्या सिंहल साम्राज्याचाही पराभव केला.

याच वेळेला, समुद्री मार्गावरील सत्ता, व्यापारावरील करवसुली, तमिळ व्यापारी जहाजांचे विशेष अधिकार या विषयांवरून सुमात्राचे श्री-विजय साम्राज्य, कंबोडियाचे साम्राज्य, थायलंडचा राजा या सर्वांशी चोल साम्राज्याचे गंभीर मतभेद होत होते.

राजराजा चोल याचा पुत्र महापराक्रमी सम्राट राजेंद्र चोल (पहिला) याने अकराव्या शतकात पूर्वेकडील बलाढ्य अशा पाल साम्राज्यावर आक्रमण करून राजा महिपाल याचा पराभव केला आणि मगध (बिहार), बंगाल, आसाम, पूर्व महाराष्ट्रासहित छत्तीसगढ, झारखंड, पूर्व उत्तर प्रदेश (काशी), ब्रह्मपुत्रेचे खोरे या सहित सर्व पूर्व आणि दक्षिण भारतावर निरंकुश सत्ता मिळविली. भारताच्या तथाकथित आधुनिक पुस्तकी इतिहासात या दोन्ही महापराक्रमी सम्राटांची फारशी वाच्यतादेखील नसणे ही अतिशय खेदकारक गोष्ट आहे असे माझे मत आहे.

असा महापराक्रमी सम्राट राजेंद्र चोल (पहिला) याच्या विश्व-दिग्विजयाची कहाणी आपण पुढील भागात पाहू या.

*- निरंजन भाटे*



# वसुधे तुझ्याचसाठी

वसुधाच माझी आहे माता
सूर्यनारायण तर साक्षात पिता
चराचरावर सत्ता आता
अस्तित्वावर का घाला आता

डायनासोर तर आले गेले
हिमयुग अवतरले ओसरले
विश्वतापाचे युग पाचरले
हरितक्रांतीचे ब्रिद न आचरले

पुढच्या लेकरांनी जर विचारले
आनंदवन भुवनी का न व्यापले
वाघ सिहांना तुम्हीच तर मारले
कित्येकांना लुप्ततेवर आणले



इतके करूनही न का भागले

सुनामी रोग राईचे भोग भोगले

अनेक ह्यातून जगले मेले

शिक्षेनंतरही का न उमजले

शहाणा हो तर आता

या जगाचा तूच हो त्राता

हरित वस्त्राने सुखवेल माता

कृपा करेल निरंतर जगत्पिता

*- मृणाल देशपांडे*



## यदा यदा हि...

१८ मे २०१५. नेहमीप्रमाणेच बातम्यांसाठी टीव्ही चालू केला. पहिलीच बातमी होती ‘के. ई. एम. मधील नर्स अरुणा शानभागचा मृत्यू.’ मन उदास झाले, भूतकाळात गेले. आज त्या घटनेला ४२ वर्षे झाली. हा एवढा दीर्घ काळ त्या एवढ्याशा जीवानं अनंत यातना भोगल्या. तीच अरुणा शानभाग - एक परिचारिका; दुःखी जीवांच्या अहर्निश सेवेचं असिधाराव्रत घेतलेली कोमल हृदयाची एक सेवाभावी स्त्री! स्वतःचं दुःख बाजूला सारून इतरांच्या दुःखावर वात्सल्याची फुंकर घालून त्यांच्या वेदनेचा दाह कमी करणारी ममतेची मूर्ती. कारवारमधील हळदीपूर या छोट्या गावातून ती स्वतःच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न घेऊन मुंबईत आली आणि के. ई. एम. सारख्या मोठ्या इस्पितळात नर्स म्हणून दाखल झाली. सगळ्याच पीडितांना आपलं मानलं; ना जात, ना धर्म, ना रंग, ना रूप, ना श्रीमंत, ना गरीब - कसलाच भेदभाव केला नाही. "हा माझा तो परक्याचा ही खुज्या मनाची मोजणी| विशाल ज्यांचे हृदय तयांना धरा कुटुंबासारखी||" या परिवारातीलच ती एक होती.

पण पदरी काय पडलं? एका कामपिपासू सैतानाच्या लग्नाच्या मागणीला नकार दिला म्हणून माणूस एवढा क्रूर होऊ शकतो? त्या नराधमाने कुत्र्याच्या साखळीने तिचा गळा आवळला; तिच्यावर पाशवी बलात्कार केला. त्याच इस्पितळातील एका डॉक्टरबरोबर तिचं लग्न ठरलं होतं. वैभवशाली सुखी जीवनाचं उत्तुंग स्वप्न तिनं फुलवलं होतं. त्या स्वप्नाची २७ नोव्हेंबर १९७३ च्या रात्री राख झाली. मान आवळल्याने तिच्या नसा बंद झाल्या आणि तिची शक्ती, वाचा, दृष्टी, संवेदना कायमच्या गेल्या. एक अचेतन शरीर राहिलं, फक्त ४२ वर्षं! २४ वर्षे ती जगली आणि ४२ वर्षे अनंत मरणे मरत राहिली. बलात्कारी सोहनलाल फक्त ७ वर्षांची सजा भोगून परत आला आणि सुखलोलुप जीवन भोगू लागला. या ४२ वर्षांच्या दीर्घ काळात नर्सेस, डॉक्टर आणि इतर अनेक जणांनी न कंटाळता तिची सेवा केली. 'वसुधैव कुटुम्बकम्' म्हणणाऱ्यांना हा नियतीचा शाप असावा. नाही तर ज्ञानदेव, महात्मा फुले, सावित्री बाई, महर्षी कर्वे यांच्या पदरी अवहेलनेचं दुःख का आलं असतं?

आपण म्हणतोय जग बदलले आहे. वर्षानुवर्षे विशाल भासणारे विश्व मानवाच्या अद्भूत चमत्कारांनी छोटे झाले आहे. कोसो मैलांचं अंतर बोटाच्या चिमटीत आलंय. पण खरंच जग बदललंय का? कशात बदल झालाय? माणसाच्या प्रगल्भतेत, त्याच्या आचरणात, का कृतीत? खरं म्हणजे एवढ्या अफाट शोधांनंतर माणूस सुखी व्हायला हवा होता. कुठं आहे सौख्य? कुठं आहे आनंद? कुठं आहे शांती? सगळं भोगून देखील माणूस अतृप्तच आहे, अशांत आहे आणि दुःखी देखील कारण चंगळवादी ग्राहक संस्कृतीत आपली वैश्विक शांतीची संस्कृती केंव्हाच लोप पावली आहे. सांस्कृतिक, सामाजिक मूल्यांचा ऱ्हास झाला आहे. पैसा मिळविण्याच्या हव्यासापायी व्यक्तिगत स्वार्थ फोफावल्याने कुटुंब व्यवस्थाच मोडकळीस आली आहे. मुलांच्या निकोप वाढीसाठी आवश्यक असणारी विवाह बंधने नकोशी वाटून live in relationship चा मार्ग सुकर वाटू लागलाय. संपत्तीच्या भोगाचा मोह पडलाय आणि संततीची गैरसोय जाणवू लागली आहे. घटस्फोटाचं प्रमाण वाढलंय आणि वृद्ध माता-पित्यांचे पाय वृद्धाश्रमाकडे वळू लागले आहेत. शेजारधर्म, मग तो वैयक्तिक असो वा आंतरराष्ट्रीय, शब्दकोशातून हद्दपार झालाय. धनिक गरीबांवर, बलवान दुर्बलांवर, सैतान मानवतेवर अत्याचार करतो आहे. जीवनातील शांती लोप पावली आहे. जीवन अशाश्वत झाले आहे. जीवनाची क्षणभंगुरता अस्वस्थ करतेय. मृत्यूचे भय माणसाला अखंड जाळते आहे. माणूस निसर्गावर मात करू पाहतोय पण तो हे विसरला आहे की ती एक शाश्वत, चिरंतन शक्ती आहे.

खरं म्हणजे पहिल्या महायुद्धानंतर युनो ची स्थापना झाली ते वैमनस्य नको, विश्वबंधुत्व हवं म्हणून. पण आज जैविक आणि आण्विक शस्त्रांच्या भीतीने जगाची झोप उडाली आहे. जग विनाशाच्या काठावर उभे आहे. धर्माच्या अफूने माणसातल्या संवेदनाच बोथट झाल्याने आत्मघातकी सेना बनवून तो मानवी जीवन नरकमय बनवतो आहे. न्यायदेवता आंधळी झालीये. धनदांडग्यानी तिला आपली बटीक बनवली आहे. भारतासारख्या प्रगतीशील देशात मनुष्यवधाची एक केस १२ वर्षे चालते आणि अपराध्याला जामीन मिळवण्यासाठी २ तास देखील पुरतात. लाखो शेतकऱ्यांच्या आत्मदहनाने लोक दुःखी होताना दिसत नाहीत. सत्तेपुढे आणि संपत्तीपुढे माना न झुकवणारे कॉन्स्टेबल जाधवसारखे अधिकारी कवडीमोलाने मारले जातात आणि सट्टाबाजार

करणारे सत्ताधीश उजळ माथ्याने फिरत आहेत. कुठं आहे उज्ज्वल भवितव्य? खरं म्हणजे उषःकाल होता होता परत अंधःकार वाढू लागलाय.

मग जग चांगलं नाहीच का? आहे ना .. जरूर आहे. भौगोलिकदृष्ट्या जग जवळ आलंय, दळण-वळणाच्या साधनांची उपलब्धता वाढली आहे, औद्योगिक क्रांतीने मानवी जीवनात आमूलाग्र बदल घडविला आहे, तंत्रज्ञानात अद्भूत क्रांती घडली आहे तरी पण माणूस कशाच्या तरी, कुणाच्या तरी शोधात आहे. कारण आता त्याचीच गरज आहे. तोच तर म्हणाला आहे "यदा यदा हि धर्मस्य .... संभवामि युगे युगे।"

*- विनय सावंत*



# ग्लोबल कुटुंब

आपण सगळे सिंगापूरमध्ये राहतो आणि आपला अनेक देशाच्या लोकांशी संपर्क येतो. आत्ताच्या काळात वसुधैव कुटुम्बकम् किंवा हे विश्वाची माझे घर, हे आणखीनच खरं झालंय. कारण जग खूप जवळ आलंय. पूर्वी इतकं आता परदेशी जाणं हे अवघड राहिलेलं नाही. आपण इतके देश फिरतो, इतक्या प्रकारचे जेवण जेवतो, कि पूर्वी सारखं आपल्याच प्रकारचं जेवण पाहिजे असा आग्रह आता राहिलेला नाही. जेवायला गेल्यावर आपण मेक्सिकन, थाई, चायनीज, हे अगदी आवडीने खातो. पूर्वीसारखं 'आमटी-भाताशिवाय आमचं काही होत नाही बुवा' हा प्रकार कमी होत चालला आहे. आता कपड्यांचं बघितलं तर जीन्स आणि टी शर्ट हा एक ग्लोबल ड्रेस झाला आहे. बायका, पुरुष सगळे जॉब करत असल्याने सुटसुटीत कपडे सर्वांनाच बरे वाटतात. जे घालून काम करायला सोपं पडेल, अश्याच कपड्यांना आपण प्राधान्य देतो. एकमेकांशी इंग्लिश बोलतो. कारण ही एक भाषा आहे जी सगळ्यांना समजते आणि बोलता येते.

सिंगापूरने जी एवढी प्रगती केली, त्याचं खूप मोठ्ठं श्रेय इथे बोलल्या जाणाऱ्या इंग्लिश भाषेला द्यावं लागेल. त्यामुळे थेट परकीय गुंतवणूक करणं, इथे नवीन व्यवसाय स्थापित करणं लोकांना सोपं जातं. भाषा ही खूप मोठी अडचण असू शकते. जसजसे देश जवळ येत चाललेत, तसतसा प्रत्येकाला आपल्या उद्योगाचा व्याप वाढवावासा वाटतो. पूर्वी भारतातल्या एका गावात जर उत्पादन युनिट आहे, तर तो व्यावसायिक फक्त त्या गावातच माल विकत असे. मग हळूहळू त्याची इच्छा झाली कि, पूर्ण भारतात आपला माल विकावा. पण आता मात्र फक्त भारतात माल विकून तो खुश राहत नाही, कारण त्याला जगभर माल विकायची इच्छा असते. म्हणून तर हल्ली जग म्हणजे ग्लोबल विलेज झालेलं आहे.

फक्त एकच वाटतं कि, सर्व प्रगती होत असताना वेगवेगळ्या देशांची संस्कृती लोप पावायला नको. कारण आता सगळेच बर्गर्स खातात, जीन्स - टॉप घालतात व इंग्लिश बोलतात. एकमेकांशी नातं जोडण्यासाठी आणि कनेक्ट होण्यासाठी हे सगळं खूप छान आहे. पण त्यात प्रत्येक देशाची संस्कृती, पेहराव, भाषा, खाणं, पिणं हे मागे पडत चाललंय. एक दिवस मी माझ्या एका चायनीज मैत्रिणीशी गप्पा मारत होते, तर तिनं सांगितलं कि चायनामध्ये फक्त लोकांचा पेहरावच बदलला असं नाही, तर त्यांनी आपली लग्नाची



पारंपारिक पद्धतसुद्धा बदलून टाकली आहे. आता रजिस्टर लग्न होऊन पार्टी दिली जाते. मला असं वाटतं की, लग्नासारख्या पारंपारिक पद्धती सोडायला नकोत. ग्रहयज्ञ, मेंदी, सीमांत पूजन, आणि सर्व विधींसकट लग्न सोहळ्याचा असा छान ३,४ दिवस आनंद घेता येतो. अर्थात हे माझं वैयक्तिक मत आहे.

माझे यजमान डॉ. राजीव असेरकर हे व्यवस्थापन (management) कॉलेजमध्ये शिकवतात आणि आम्ही कॅम्पसवर राहतो. आमच्या इथे बराचसा स्टाफ आणि विद्यार्थी हे परदेशी असल्याने आमचा त्यांच्याशी रोज संपर्क असतो. त्यानिमित्ताने वेगवेगळ्या देशांच्या चाली रिती, संस्कृती समजावून घेता येतात. नुकतीच एका अमेरिकन जोडप्याशी छान मैत्री झाली व गप्पा मारताना जाणवले की ते ३ नातवंडांचे अतिशय प्रेमळ आजी- आजोबा आहेत. आपल्या मुलीची काळजी वाटणारे ब्रिटीश बाबा, किंवा जेवणाकरता बायकोची वाट पाहणारा ऑस्ट्रेलियन नवरा हे मनानी आपल्या सारखेच आहेत हे जाणवते.


आपल्या आधीच्या पिढीला ही संधी मिळत नव्हती. माझे आई, वडील, सासू, सासरे हे पूर्ण आयुष्य एकाच गावात राहिले. व खूप जणांनी तर एकाच जागी नोकरी केली, व तिथून निवृत्त होऊनच बाहेर पडले. अर्थात तेही स्थिर आयुष्य छान होतं. आता आपल्या व आपल्या मुलांच्या जीवनशैली मध्ये फारसा फरक राहिलेला नाहीये. कुटुंबातले, नात्यातले लोक परदेशी स्थायिक असण्याचं प्रमाणही जास्त आहे व एकमेकांकडे परदेशी जाणं पण खूप वाढलंय. कारण विमानाने प्रवास करणं लोकांना परवडणारं झालं आहे.

जग जवळ आणण्यात मोबाईल फोन, whatsapp, फेसबुक आणि ईमेल्सचा अर्थातच खूप मोठा हातभार आहे. आता भारतात IT कम्पनी मधे काम करणारे लोक US, UK च्या वेळा पाळत काम करताना दिसतात. परदेशी विद्यापीठात शिक्षण घेण्याचं प्रमाणही खूप वाढलं आहे. ह्या सगळ्यामुळे हे विश्वची माझे घर हे अगदी खरं झालं आहे. फक्त ह्या ग्लोबल कुटुंबात लोकांनी एकमेकांशी सलोख्याने राहावं, हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

*- मेघना असेरकर.*



# पुस्तक परिचय - गॉन गर्ल




निक डन. न्यूयॉर्कमधल्या एका मासिकात नोकरी करणारा एक लेखक. रुबाबदार, हजरजबाबी, पुरुषत्वाच्या प्रचलित कल्पनांप्रमाणे देखणा आणि छानशी विनोदबुद्धी असलेला तरूण. त्याच्याशी बोलताना तो चतुर, सुस्वभावी आणि आत्मविश्वासाने भरलेला वाटतो. ॲमी इलियट. न्यूयॉर्कमध्ये राहणारी, सुंदर, श्रीमंत आई-वडिलांची एकुलती एक मुलगी आणि स्वतंत्र असलेली आधुनिक तरूणी. तिच्या व्यक्तिमत्त्वात गोडवा आहे, उत्तम संगोपनातून आलेले सुसंस्कार आहेत आणि आधुनिक तरुणीचा आत्मविश्वास आहे.

निक आणि ॲमी एका सामायिक मित्राच्या पार्टीत भेटतात आणि त्यांच्यातल्या आकर्षणाच्या ठिणग्या लगेचच तडतडू लागतात. थोडा काळ चाललेल्या प्रणयाराधनेनंतर व एकमेकांमध्ये मनाने व शरीराने पुरेसे गुंतल्यानंतर ती दोघं लग्नाच्या बंधनात बांधून घेतात.

बदलत्या आर्थिक वास्तवात लग्नानंतर थोड्याच काळाने निकची आणि त्यानंतर काही काळाने ॲमीचीही नोकरी जाते. त्यातच निकला त्याच्या आईला कॅन्सर झाल्याची वाईट बातमी समजते. आईची काळजी घेता यावी म्हणून निक आणि त्याच्याबरोबर ॲमीही निकच्या मूळ गावी म्हणजे मिसूरी राज्यातल्या नॉर्थ कार्थेज नावाच्या गावी जाऊन राहतात. ॲमीच्या भविष्यासाठी तिच्या आईवडिलांनी साठवलेले सगळे पैसे वापरून निक आणि त्याची बहिण मार्गो त्या गावात एक बार चालू करतात. त्यांच्या तिथल्या उपनगरी घरात (ॲमीच्या मते मॅकमॅन्शन) ॲमी गृहिणी होऊन राहते. असे काही दिवस व्यतीत

केल्यानंतर त्यांच्या लग्नाच्या पाचव्या वाढदिवशीच ॲमी अचानक गायब होते आणि सुरू होते एक अंगावर काटा आणणारी गोष्ट.

जिलियन फ्लिन या लेखिकेच्या "गॉन गर्ल" या कादंबरीत ही एका लग्नाची गोष्ट थरारकपणे उलगडत जाते. प्रणयाच्या हलक्या गुलाबी रंगाच्या छटेपासून सुरू होणारी ही कादंबरी हळूहळू गडद होत जाते आणि शेवटी एका साकळलेल्या काळपट लाल क्षणावर येऊन थांबते.

कादंबरीच्या पहिल्या अर्ध्या भागात लग्नापूर्वीचा नुसताच निक; नोकरी गेल्यानंतरचा निक; आईच्या आजारपणाची बातमी समजलेला निक; निकची आजारी आई; स्मृतीभ्रंश झालेले, सतत डोक्यातल्या कोणत्यातरी बाईला शिव्या घालणारे आणि असायलममधून वारंवार गायब होऊन घरी उगवणारे त्याचे वडील ही चित्रं ॲमीच्या नजरेतून वाचकाला दिसतात. ॲमीचे मानसशास्त्रज्ञ असलेले आणि एकमेकांच्या प्रेमात भीतिदायकपणे सतत आकंठ बुडालेले आईवडिल. "ॲमेझिंग ॲमी" या अतिशय लोकप्रिय बालकथामालिकेतून त्यांनी अजरामर केलेले तिचे बालपण; त्यातून कमवलेला बक्कळ पैसा आणि त्यातूनच तिला आदर्श मुलगी बनवण्यासाठी दिलेले धडे; ॲमीच्या मित्र मैत्रिणींबाबतच्या काही विचित्र घटना; लग्नाच्या प्रत्येक वाढदिवशी ॲमीने रचलेला, निकची कसोटी पाहणारा ट्रेझर हंटचा खेळ इत्यादी गोष्टी निकच्या दृष्टिकोनातून येतात.

कादंबरीच्या उत्तरार्धात मात्र या चित्रांमधल्या दिसलेल्या आणि न दिसलेल्याही छटा हळूहळू गडद होऊ लागतात आणि ती चित्रे आपल्यासमोर आणणाऱ्या पात्रांच्या विश्वासार्हतेवरही प्रश्नचिन्ह उमटू लागते. ॲमी गायब झाल्यानंतरचा पोलिस तपास, शेजाऱ्या-पाजाऱ्यांचे वागणे, प्रसारमाध्यमांचा अचरटपणा अशा अनेक गोष्टींमधून समाज, समाजाच्या धारणा आणि त्याचा माणसाच्या आयुष्यावर होणारा परिणाम मार्मिकपणे अधोरेखित होतो. पण कादंबरीचा मुख्य गाभा आणि शक्तीस्थान म्हणजे निक आणि ॲमीच्या खाजगी आयुष्याचे मर्मभेदी चित्रण. त्या दोघांच्या वागण्याने आणि त्यांच्या विचारांनी वाचकाच्या मनात नेमके प्रश्न उभे करण्याची लेखिकेची हातोटी विलक्षण आहे. निकचा आपल्या वडिलांबद्दलचा द्वेष आणि आपणही कुठेतरी त्यांच्यासारखे असू ही भीती किंवा ॲमीचे अतिआदर्श आईवडिल, त्यांचे सुप्त दडपण आणि सततच्या लक्ष देण्यातून तिच्यात आलेला आत्मकेंद्रितपणा

इत्यादी मानसिक जडणघडणींच्या शक्यता ढोबळपणा न येऊ देता लिहील्याने पात्रे खऱ्या माणसांइतकी गुंतागुंतीची होतात आणि त्यांच्या गोष्टीला एक प्रकारची सच्चाई येते. जगातल्या सर्वात आदिम सत्तासंघर्षाचे हे चित्र जितके रोमांचक तितकेच विचारप्रवर्तक होते.

नवरा-बायको एकमेकांच्या इतक्या जवळ असूनही एकमेकांना खरोखर ओळखतात का? एकमेकांना एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्विकारतात की केवळ आपल्या अपेक्षापूर्तीचं साधन म्हणून पाहतात? व्यक्तीशी लग्न केलं तरी तिचा भूतकाळ, तिचे इतर नातेसंबंध व त्या अनुषंगाने येणारे प्रश्न आपले म्हणून स्विकारतात? मुख्य म्हणजे या सत्तासंघर्षातून बाहेर पडता येणे शक्य आहे का? असे अनेक प्रश्न निर्माण करण्यात कादंबरी यशस्वी ठरते.

"What are we? What have we done to each other? Where do we go from here?" ही कादंबरीच्या मलपृष्ठावरील वाक्ये किती समर्पक आहेत ते कादंबरी वाचल्यावरच पुरेपूर समजते.

*- निरंजन नगरकर*



# ऋणानुबंध

त्या दिवशी मी क्रांजी ते चोआ-चू-कांग प्रवास MRT ने करत होतो. रात्रीची साधारण ८.३० ची वेळ होती, डब्यात फारशी गर्दी नव्हती. मी माझ्या सवयीप्रमाणे ट्रेनच्या दारात वाचत उभा होतो. MRT क्रांजी स्टेशनवर नेहमीप्रमाणे थांबली होती. दार बंद होण्याच्या फक्त काही क्षण आधी एक सुमारे ३ वर्षांची छोटी मुलगी पळत येऊन अकस्मात डब्यात घुसली, यंत्रवत दारे बंद झाली आणि ट्रेन सुरु झाली. दाराच्या काचेतून मी सहज बघितलं तर एक बाई ओरडत, एका बाळाला बाबागाडीतून सांभाळत ट्रेनच्या मागे पळत येताना दिसली. हे सगळ निमिषार्धात घडलं होतं. ती बाई, जी त्या मुलीची आई असावी, बाबागाडीतून बाळाला आणि ह्या छोट्या मुलीला घेऊन येत होती, ट्रेनची दारे उघडी दिसल्यावर ही लहान मुलगी आईचा हात सोडून धावत ट्रेनमध्ये शिरली होती. बाळ आणि बाबागाडीमुळे त्या बाईला मुलीचा वेग साधता आला नाही किंवा त्या मुलीला वेळीच थांबवता आलं नाही. परिणामी ती लहान मुलगी चालत्या गाडीत, आई फलाटावर आणि ही संपूर्ण परिस्थिती कळलेला मी एकमेव!

गाडीच्या डब्यातलं आपत्कालीन (इमरजन्सी) बटण दाबून मी चालकाला झालेल्या प्रकाराची कल्पना दिली. त्याने मला पुढच्या - युटी स्टेशनवर उतरण्याची सूचना केली. आपली आई मागे राहिल्याचं लक्षात आल्यावर ह्या मुलीने खणखणीत आवाजात भोकाड पसरलं होतं. मला त्या बिचारीची दया आली. अजाणतेपणी ती एका मोठ्या संकटात सापडली होती. अश्या वेळी माझ्यातली माणुसकी जागी झाली नसती तरच नवल! चवड्यांवर बसून मी तिची उंची गाठण्याचा प्रयत्न केला. तिला “रडू नको, तुझी आई तुला भेटेल” असं तिला समजेल अश्या इंग्लिशमध्ये सांगायचा प्रयत्न केला. पण त्या बिचारीला इंग्लिश भाषेचा काही लवलेशही नव्हता. शेवटी मी यूटी स्टेशन येईपर्यंत काहीतरी टिवल्या-बावल्या करत त्या छोटीला व्यस्त ठेवलं. ती माझ्याकडे अतिशय परक्या नजरेनी बघत होती पण सुदैवाने रडायची थांबली होती.

यूटी स्टेशनला गाडी आली तेंव्हा माझ्या डब्यापाशी MRT चे सहाय्यक आमची वाट बघत उभे होते. डब्याची दारं उघडताच सहाय्यक डब्यात शिरले आणि त्या मुलीला बाहेर येण्यासाठी प्रवृत्त करायला लागले. त्या लालभडक शर्टमधल्या लोकांना घाबरून ती लहानगी माझ्यामागे लपली. जसजसे ते तिला बाहेर घेऊन जाण्याचा प्रयत्न करू लागले तसतसा तिने माझ्या मांडीला दोन्ही हातानी घट्ट मिठी मारून बाहेर जायला ठामपणे अबोल नकार दिला. त्या परक्यांसमोर तिला आता मी ओळखीचा - विश्वासाचा वाटत होतो. नाईलाजाने त्या मुलीबरोबर मीसुद्धा फलाटावर उतरलो. दार बंद होऊन गाडी निघून गेली.

दम्यान MRT च्या सहाय्यकांनी एकमेकांशी संपर्क साधून ह्या माय-लेकींचे मीलन यूटी स्टेशनवर घडविण्याचे योजले होते. पुढच्या काही मिनिटात दुसरी ट्रेन आली. ट्रेनमधून ती आई बाळ आणि बाबागाडी घेऊन खाली उतरली. हातातली बाबागाडी अक्षरश: पळवत ती आमच्या जवळ आली. आईने मुलीला घट्ट मिठी मारली. अनेक भावना अश्रूंच्या रूपाने ओघळत होत्या. काय टोकाचं वाईट होऊ शकलं असतं ह्याचा थरार, स्वत:च्या निष्काळजीपणाबद्दलचा राग, प्रसंगातून सहीसलामत सुटल्याचा नि:श्वास - आनंद.. एका मातेच्या किती भावना एक पुरुष समजून घेऊ शकेल! काही क्षणात त्या माऊलीने लेकीला आसवात पूर्ण भिजवून टाकलं होतं. त्या अबोल-ओल्या-मिश्र भावनांचा पूर बघून मी हेलावून गेलो होतो. ती आई मला खूप वेळा thank you म्हणाली. बाकी भावना व्यक्त करायला तिला तिच्या मातृभाषेचा आधार घ्यावा लागला, जिचा मला गंधही नव्हता. पण तिला काय म्हणायचं आहे हे कळायला मला शब्दार्थ कळायची गरज नव्हती, गरज होती ती भावार्थ जाणून घेण्याची.

मी पुढची ट्रेन घेतली तेंव्हा दिसेनासा होईपर्यंत त्या मायलेकी मला फलाटावरून छान हसत "अच्छा" करत राहिल्या. त्यांच्या चेहेऱ्यावरचं समाधानचं हसू मी कधीच विसरू शकणार नाही. ती लहान मुलगी मला एका विचित्र अपघाताने भेटली होती. त्या प्रसंगात मी जे काही केलं ते जरी माणुसकीच्या नात्यानी केलं असलं तरी थोड्याफार प्रतीक्षेनंतर ती मुलगी तिच्या आईकडे सुखरूप जाणार आहे हे मी पक्कं गृहीत धरलं होतं. म्हणूनच संपूर्ण प्रसंगाकडे बघण्याचा माझा दृष्टीकोन

- 'पडली जबाबदारी समर्थपणे पार पाडा' इतकाच रुक्ष होता. पण त्या छोटीला शांत करण्याच्या प्रयत्नात ती माझ्यावर विश्वास टाकेल अशी पुसटशी शक्यतासुध्दा माझ्या मनाला शिवली नव्हती. एका ३ वर्षाच्या चिमुरडीने एकही शब्द न बोलता मला रुक्ष जबादारीच्या पुढचा एक पाठ शिकवला होता. लहान मुलं सहजा-सहजी परक्या माणसावर विश्वास ठेवत नाहीत आणि म्हणून लहान मुलांचा विश्वास जिंकण्यात मला नेहमीच धन्यता वाटते. ह्या मुलीचा विश्वास संपादन केला असल्याच्या जाणीवेने मला गहिवरून आलं होतं.

कुटुंब म्हणजे तरी काय - प्रेम आणि विश्वासावर बांधलेले ऋणानुबंध! मग असे ऋणानुबंध जिथे जुळतील तिथे कुटुंबच! म्हणजे प्रेम आणि विश्वासावर नाती बांधू शकण्याची माणसाची क्षमता ही एकमेव मर्यादा! जर ह्या मर्यादेवर माणूस विजय मिळवू शकला तर - वसुधैव कुटुंबकम!

*- विश्वास वैद्य*



# सर्वेऽपि सुखिनः सन्तु

"अयं बन्धुरयं नेति गणना लघुचेतसाम् | उदारचरितानां तु वसुधैव कुटुम्बकम् ||"

हे हितोपदेशातील मूळ सुभाषित आहे. हा माझा, हा परका हा आप-परभाव कोत्या मनाच्या लोकांमध्ये असतो. ज्यांचे मन विशाल असते त्यांना सारे जग सामावून घेता येते. त्यांच्यासाठी पृथ्वी हे कुटुंब असते.

विज्ञान आणि तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे हल्ली जग जवळ आले आहे. लहान झाले आहे, चांगले जोडले गेले आहे असे आपण म्हणतो. वाहतुकीची साधने, पत्रव्यवहार, संगणक, दूरध्वनी, भ्रमण दूरध्वनी ह्यामुळे साता समुद्रापलीकडे असलेले आपले नातेवाईक, मित्रमैत्रिणी यांच्या आपण सतत संपर्कात असतो. आपल्या जीवनातील घडामोडी, सुखदुःखे, चांगल्या-वाईट बातम्या कळविणे, अडीअडचणीला मदत मागणे हे सर्व आधुनिक तंत्रज्ञानामुळे शक्य झाले आहे. ऑफिसेसमधूनही टेलीकॉनद्वारे जगातील कुठल्याही देशात असलेल्या माणसांबरोबर काम करता येते. हल्ली घरबसल्या खरेदी-विक्री, बँकांचे व्यवहार, कुठल्याही विषयावर माहिती मिळवणे हे सर्व करता येते. आजकाल नोकरी-व्यवसायानिमित्त लोक वेगवेगळ्या देशांमध्ये वास्तव्य करत आहेत. भिन्न भिन्न लोकांच्या संपर्कात येत आहेत. आपल्या देश-बांधवांसोबत तिथे नवीन विश्व निर्माण करत आहेत. शिवाय स्थानिक व इतर लोकांबरोबर भाषा, संस्कृती, सण-उत्सव, खाद्यपदार्थ यांची देवाणघेवाण करत आहेत. सिंगापूर याचे उत्तम उदाहरण आहे. भारतापासून आपण खूप दूर आहोत असे कधी वाटतच नाही. खास करून तरुण पिढी शिक्षणाच्या निमित्ताने वेगवेगळ्या देशात जाऊन त्यांची दुनिया निर्माण करत आहे. आपले जीवन सोबती निवडून वेगवेगळ्या ठिकाणी स्थायिक होत आहे. तरीही मातृभूमीशी त्यांची नाळ जोडलेली आहे. ह्या गोष्टींचा विचार करता जग अतिशय जवळ आले आहे आणि अंतर कमी होऊन चांगले जोडले गेले आहे.

पण हाच अर्थ 'वसुधैव कुटुम्बकम्' ह्या उक्तीचा आहे का? यापुढे जाऊन आध्यात्मिक दृष्टीकोनातून विचार केला जाणे गरजेचे आहे. परमेश्वर किंवा परमात्मा सगळीकडे भरून

राहिलेला आहे. प्रत्येक व्यक्तीमध्ये त्यांचा अंश आहे. आत्मा अमर आहे. शरीर हे तात्पुरते धारण केलेले वस्त्र आहे ज्याचा कधी ना कधी नाश ठरलेला आहे. असे आहे तर व्यक्ती व्यक्तीमध्ये फरक का केला जातो? जन्माला आलेल्या प्रत्येक माणसाला जीवनाच्या मूलभूत गरजा भागून सुरक्षिततेने जगण्याचा अधिकार आहे. पण प्रगत देशांमध्ये लोक ऐशारामात जगताहेत तर इतर देशात अन्नपाण्याविना मरताहेत. देशादेशांमध्ये वेगवेगळ्या कारणांमुळे तंटे चालू आहेत. त्याचे रुपांतर युद्धात आणि पर्यायाने विनाशात होत आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानातील नवनवीन शोधांचा उपयोग प्रत्येक माणसाच्या हितासाठीच झाला पाहिजे त्याच्या विनाशासाठी नाही. युद्धाचे परिणाम वाईटच असतात. त्यात कुणाचेच हित नसते.

वर्णभेद, जातिभेद, वंशभेद, धर्मभेद, भाषाभेद सगळे भेदभाव विसरून माणसाने परस्परांच्या कल्याणाचा व सुखाचा विचार केला पाहिजे. जगातील सगळ्या देशांनी आपापसातले वाद, भांडणतंटे मिटवून परस्पर सामंजस्याने व सहकार्याने राहायला पाहिजे. महात्मा गांधींनी सांगितलेले अहिंसा हे तत्त्व अंगिकारले पाहिजे. मानवजातीला धोकादायक असलेल्या सर्व गोष्टी नष्ट केल्या पाहिजेत. एकच जागतिक सरकार व पृथ्वीवरील सर्व माणसे नागरिक असे होऊन जागतिक शांती प्रस्थापित होणे ही आदर्श संकल्पना 'वसुधैव कुटुम्बकम्' यामध्ये अभिप्रेत आहे.

सर्वेऽपि सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः |

सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दुःखभाग भवेत् ||

असे जेंव्हा प्रत्यक्षात होईल तेंव्हाच 'वसुधैव कुटुम्बकम्' चे स्वप्न खऱ्या अर्थाने साकार होईल.

*- गीता पटवर्धन*



# पावसाची आली सर

पावसाची आली सर
घालूनिया कोडे
उत्तरांची वाढे झार
गुन्तवीत तिढे

येई सरीवर सर
पागोळ्या गळती
दाटलेली सांज होई
उनाड धरती

अशी कोसळता सर
मन अनावर
नभ उतरुनी डोळा
सांडे काठावर

बरसली अशी सर
गूढ चित्रलिपी
जन्मावरी गोंदलेली
प्राक्तनाची नक्षी

*- वृंदा टिळक*





## सकार हवा, नकार नको

"वसुधैव कुटुम्बकम्" ह्या श्लोकाने ज्ञानदेवांची आवर्जून आठवण होते. ते म्हणतात:

हे विश्वचि माझे घर, ऐसी मति जयाची स्थिर ।

किंबहुना चराचर, आपणचि जाहला ॥

इथे ज्ञानदेवांना अभिप्रेत अर्थ हा की अख्खे जगच माझे घर बनून राहिले आहे. त्यात प्राणिमात्र सुद्धा सामावले आहेत. बरे-वाईट, सज्जन-दुर्जन सगळ्यांना समान मानून ते सर्वांचे भले चिंतित आहेत. त्यासाठी मनाचा प्रचंड मोठेपणा त्यांच्याकडे आहे. आपल्यासारख्या सामान्य माणसांकडे ज्ञानदेवांसारखा मनाचा मोठेपणा सापडणे दुर्मिळच. परंतु बदलत्या तंत्रज्ञानामुळे जग छोटं झालंय, जवळ आलंय. नाना प्रकारचे लोक एकमेकांच्या संपर्कात आल्यामुळे विचारांची खुली देवाण-घेवाण होत आहे.

**सकारात्मक बदल**

संपर्काच्या कक्षा वाढल्या. देशविदेशातील लोकांची मने जुळली. ही परिस्थिती कुणामुळे निर्माण झाली? हा युगंधर दुसरा तिसरा कोणी नसून इंटरनेट म्हणावा लागेल. आता कोणत्याही वेळी जगाशी आपल्याला हवा तेव्हढा संपर्क होऊ शकतो. लहानपणीच ह्या जादूगाराची ओळख झाल्यामुळे मुलांचे ज्ञान अफाट होत चालले आहे. जातिभेदाच्या, धर्माच्या भिंती कोसळत आहेत. आजच्या तरुणाचा भविष्याकडे बघण्याचा दृष्टीकोनच बदलला आहे. पूर्वी लोक एखादा अपवाद वगळता एकमार्गी नोकरी करत. काटकसर करून पैसे साठवत. मुलांच्या, तरुणांच्या बुद्धीला एका ठराविक चौकटीत जखडून राहावे लागत होते.

पण मग एक एक करून टेलीविजन, मोबाईल, आणि इंटरनेट आले. ज्ञानाचे भांडार खुले झाले. तरुणांनी आपले नवीन मार्ग चाकोरीबाहेर शोधायला सुरुवात केली. लोकांची मानसिकता बदलली. म्हणूनच म्हटले आहे -



केल्याने देशाटन, पंडित मैत्री, सभेत संचार|
शास्त्र ग्रंथ विलोकन, मनुजा येतसे चातुर्य फार||

**वस्तूंची रेलचेल / दर्शनी बदल**

जागतिकीकरणामुळे भौगोलिक सीमारेषा केवळ नकाशावरच राहिल्या आहेत. मनुष्याच्या मनातील सीमारेषा कधीच पुसट झाल्या आहेत. भारतीय लोक नाहीत असा देश सापडणे कठीण आणि जिथे भारतीय, तिथे भारत! आपले कपडे, खाणे-पिणे, राहण्याच्या पद्धती किती बदलल्या आहेत. पूर्वीचे दिवस आठवून बघा. आपले कपडे किती साधे असत. न कुठली फॅशन, न कुठली वेगळी पद्धत. आज आपण देशविदेशीचे कपडे पाहतो. त्या कपड्यात आणि आपल्या इथे मिळणाऱ्या कपड्यात काही फरक आढळतो का? आमच्या लहानपणी फक्त bata च्या चपला आणि बूट मिळत. चांभाराकडे त्याने स्वतः बनवलेल्या चपला असत. आता आपण बाजारात गेलो की अनेक देशातल्या चपलांची झगमगती दुकाने आपल्याला भुलवतात. तीच गोष्ट पिशव्यांची, पर्सेसची.

ह्या वस्तूंची रेलचेल वाढली खरी पण हा बदल केवळ बाहेरील नाही. दुसऱ्याचे ते वाईट आणि आपला तो बाब्या म्हणण्याची वृत्ती हळूहळू बदलली. समाजातील उच्च नीच, जाती-जातीतील भेदभाव नष्ट होत आहेत ह्याचे हे उदाहरण म्हणावे लागेल.

**पोटातून हृदयाकडे**

माणसाच्या सुखाचा मार्ग पोटातून जातो असे म्हणतात. म्हणून आपण आपल्या खाण्याच्या पदार्थांकडे वळू या. खाण्याच्या पदार्थात विविधता यायला सुरुवात आपल्या राज्याराज्यातील पदार्थांच्या देवाण-घेवाणीने झाली असे म्हटले तर फारसे वावगे ठरणार नाही. माणसे कामाच्या निमित्ताने दूर जावू लागली पण ते आपले पदार्थ घेऊन! मग मुंबईत ढोकला फाफडा लोकप्रिय व्हायला वेळ लागला नाही. तीच गोष्ट बाकीच्या राज्यांची. आता हे चित्र देशादेशाच्या सीमा

ओलांडून गेले आहे. म्हणून तर आज आपल्या ताटात चायनीज, इटालियन पदार्थ हजेरी लावून बसलेले दिसतात.

**मुलींच्या / स्त्रियांच्या मानसिकतेत बदल**

शिक्षणाच्या / नोकरीच्या बाबतीत "सातच्या आत घरात" ही संकल्पना मागे पडत आहे. आजची स्त्री शिकण्यासाठी, नोकरीसाठी देशाच्या सीमा ओलांडून प्रवास करते आहे. त्यामुळे तिची दृष्टी बदलते आहे. विवाहबंधने केवळ लादलेली न राहता मुक्त होत आहेत. आज माझी मुलगी अमेरिकेसारख्या दूर असलेल्या देशात शिक्षणासाठी एकटी राहत आहे. माझ्याच काय जगभरात अनेक घरात कुटुंबातील एक तरी व्यक्ती परदेशी राहत असलेली आढळून येते.

मात्र कधीकधी हे चित्र भिववणारे वाटते. मोठ्या शहरातून फक्त आई वडील घरात उरले आहेत. वृद्ध घरात राहतात आणि तरुण पिढी शिक्षण किंवा नोकरीनिमित्त परदेशी राहते. त्यांनी तिथून परत यावे, मायदेशाची हाक ऐकावी असे मला वाटते. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक होता कामा नये. नवीन कक्षा जोडताना आपली नाळ तोडून चालणार नाही. नवीन चालीरीती शिकताना आपल्या संस्कृतीला विसरून चालणार नाही.

ताई, अक्का, मावशी, आंटी अनेक मिळतील. म्हणून प्रत्यक्ष आईला विसरून कसे चालेल?

*- मोहना कारखानीस*



## SG50

१३व्या शतकात वसवलेली तेमासेक किंवा सिंगापुरा ही बंदरवजा वसाहत हिंदी महासागर आणि दक्षिण चीनी समुद्र यांच्या मधील जलव्यापारासाठीची महत्त्वाची प्रादेशिक बाजारपेठ झाली होती. त्या आधी ह्या वसाहतीनं अनेक स्थानिक आणि युरोपीय वादांना तोंड दिलं आणि इंग्रजांनी इथे त्यांचं वास्तव्य केल्यावर मग ही बंदर वसाहत स्थापित झाली. प्रादेशिक व्यापारकेंद्र झाल्यामुळे व्यापार-उदीम, नोकरी-धंदा, आणि मग राहण्यासाठी म्हणून वेगवेगळ्या राष्ट्रीयत्वाचे लोक त्याकडे आकर्षित झाले.

सिंगापूर मधल्या रहिवाशांची युद्धानंतरची पहिली जनगणना १९४७ साली करण्यात आली. त्यात ९,४०,८२४ लोकसंख्येची नोंद झाली. तिच्यात ७५.२% चीनी, १२.९% मलेशियन, ७.७% भारतीय, १.३% युरेशियन आणि २.९% युरोप आणि इतर ठिकाणचे लोक होते. हे वांशिक वैविध्य साधारण त्याच प्रमाणात आजच्या आधुनिक सिंगापुरातही दिसतं. अशा प्रकारची सांस्कृतिक व्यामिश्रता आणि वैविध्य असल्यामुळे सिंगापूर सामाजिक आणि वांशिक सलोख्यावर फार भर देते. त्यामुळेच इथे राष्ट्रीय ओळख आणि वैचारिक बैठक असण्याची गरज भासली. मग १९९१ मध्ये सिंगापूरच्या संसदेनी सर्व वांशिक, धार्मिक गटांना मान्य होतील अशी पाच विधानं समान मूल्ये म्हणून निवडली. या सामायिक मूल्यांना बैठक होती ती सिंगापूरच्या समुदयप्रधान मूल्यांच्या वारश्याची. ती मूल्यं अशी:

१. समुदायाआधी राष्ट्र आणि स्वत:आधी समाज
२. कुटुंब हा समाजाचा मुलभूत घटक
३. सामुदायिक सहकार्य आणि व्यक्तीचा आदर
४. संघर्ष नव्हे, एकमत
५. वांशिक आणि धार्मिक सुसंवाद

१९६५ मध्ये सिंगापूर स्वतंत्र झालं तेव्हा त्याची लोकसंख्या १९,००,००० होती. २०१५ च्या मध्यवार्षिक आकडेवारीनुसार लोकसंख्या आता ५५,००,००० वर पोचली आहे - ५० वर्षात तिप्पट

वाढ! सिंगापूरच्या लोकसंख्या वाढीचा एक महत्त्वाचा घटक म्हणजे या बेटावर वाढलेली स्थलांतरित लोकसंख्या. १९७० मध्ये ९७% लोक सिंगापूरचे रहिवासी होते. २०१४ मध्ये तो आकडा ७०% होता.

सिंगापूरच्या रहिवाश्यांबरोबरच या स्थलांतरित लोकांनीही सिंगापूरच्या आर्थिक भरभराटीला साहाय्य केलं आहे. दर डोई वार्षिक सकल उत्पन्नात झालेल्या वाढीतून सिंगापूरचं यश पाहता येतं. १९६५ मध्ये १६५ तर २०१३ मध्ये ५५,१८५ अमेरिकी डॉलर्स. ह्यामुळे सिंगापूर जगातल्या पहिल्या १० अर्थव्यवस्थांमध्ये जाऊन बसलं आहे आणि ते ही अवघ्या ५० वर्षात!

ही आर्थिक भरभराट सिंगापूरच्या रहिवाश्यांकरता संधी तसेच आव्हानंही घेऊन आली आहे. हा वाढीचा वेग राखायचा तर वाढीव मनुष्यबळ हवं किंवा उत्पादनक्षमतेत लक्षवेधी सुधारणा हवी. जानेवारी २०१३ मधील एका शोधनिबंधात सिंगापूरची लोकसंख्या २०३० पर्यंत ६९,००,००० वर जाईल असं भाकित केलेलं आहे. एकसंध समाज, चैतन्यवती अर्थव्यवस्था, उच्च दर्जाचे राहणीमान या तीन पायाभूत गोष्टींनी २०३० पर्यंतची लोकसंख्येमधली ही वाढ पेलता येईल. लोकसंख्याविषयक धोरणावरच्या शोधनिबंधानी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमधील कोंडी, परवडण्याजोगी घरे, पायाभूत सुविधांवर पडणारा ताण, आणि राहणीमानाच्या दर्जातील घसरण अश्या महत्त्वाच्या आव्हानांना तोंड देण्याच्या क्षमतेविषयी गंभीर वादविवाद सुरु केला.

५० वे स्वातंत्र्यवर्ष सिंगापूरकरता महत्त्वपूर्ण ठरू शकते. पुढच्या ५० वर्षात सिंगापूरमध्ये पाचात एक जण ६५ वर्षापेक्षा जास्त वयाचा असणार आहे. सर्वसाधारण आयुर्मान १९६५ पासून २० वर्षांनी वाढून २०१३ मध्ये ८२.५ वर पोचले आहे आणि ह्या पुढे ते वाढतच जाईल. सिंगापूरच्या लोकांच्या गरजा आजच्या पेक्षा खूप वेगळ्या असतील. सिंगापूर कसे बदलेल हे फक्त काळच सांगू शकेल.

*- सतीश लेले*



# गाणे जीवनगाणे

*वयाच्या अकराव्या वर्षी पहिली संगीत मैफल, आजवर जगभरातल्या २०० हून अधिक शहरांतून मैफिली, सूररत्न किताब आणि इतर अनेक मानाचे पुरस्कार, आणि खुद्द वसंतराव देशपांड्यांकडून "हा मुलगा गाण्याकरता जन्माला आला आहे, याला फक्त गाणंच करू द्या" असा आशीर्वाद! यापेक्षा रोमांचक आणि काय असू शकतं? गेली ३८ वर्षं आपल्या गाण्यानी रसिकांवर मोहिनी घालणाऱ्या पं. संजीव अभ्यंकरांनी ऋतुगंधला मुलाखत देण्यासाठी वेळ काढला, मनमोकळ्या गप्पा मारल्या आणि या अंकासाठी खास त्यांच्या जगभरच्या प्रवासात "वसुधैव कुटुम्बकम्" त्यांना कसं अनुभवाला येतं हे ही सांगितलं. ही मुलाखत तुम्हांला आवडेल अशी खात्री आहे.*



**शास्त्रीय गायक व्हायचं कधी ठरवलंत? का ते तुमच्याकरता ठरवलं गेलं होतं?**

**: आईनं निर्णय घेतला**

माझ्याकरता ठरवलं गेलं होतं. माझी आई संगीतामध्ये पीएचडी होती आणि परफॉर्मिंग अँगलनी गाणं शिकली होती. माझी आजीही गायची. बाबा माझे गायचे नाहीत पण अभ्यंकरांच्या साइडनी पण गाणं होतं घरात. बाबांचा आवाज चांगला आहे. बाबांचे नाना - म्हणजे त्यांच्या आईचे बाबा - हे गोखलेबुवा म्हणजे त्यावेळचे फुल टाईम संगीत शिक्षक होते. तर असं संगीत जेनेटिकली दोन्ही बाजूंनी माझ्याकडे आलं.

आईचं म्हणणं असं की आजीनं तिला वेळेत गायकी शिकायला नाही पाठवलं. आईला पंडित जसराजजींचं गाणं खूप आवडायचं. काहीसं उशीराच्या वयामध्ये जसराजजींनी तिला शिष्या म्हणून

स्वीकारलं. ते रेअर होतं. तिचं गाणं ऐकून "तुला उशीर झालाय पण तरी मी तुला शिकवीन," म्हणाले ते. तर अशी माझी बॅकग्राउंड होती. आई ही पहिली गुरु माझी. ती नॉलेजेबल होती, तिनं परफॉर्म केलेलं होतं. त्यामुळे सततचा एक गुरु माझ्याबरोबर घरात होताच. आईला कळत होतं आपण काय करतोय ते. पण निर्णयाचं श्रेय आई, आईची आई आणि बाबा यांना जातं. मी पूर्ण वेळ गायक होणार हा निर्णयही त्यांनी घेतला.



**उपजत कल होताच**

क्लासिकल कडे माझा कल खूपच होता. आईला मी सांगायचो - एक सात आठ वर्षांचा असताना - की मला प्रभा अत्र्यांची तेव्हाची गाजलेली कलावती आणि मारू बिहागची एलपी ऐकायचीये - जागू मैं सारी रैना बलमा आणि तन मन धन तोपे वारूँ. मग मी ते ऐकत बसायचो. मग "बोले रे पपीहरा" आलं की म्हणायचं आई हे मियां मल्हार सारखं वाटतंय ना. त्यामुळे माझी आवड पण ती होती. त्यामुळे आईला असं वाटलं की आपल्याला क्लासिकल शिकायला उशीर झालाय, तसा संजीवला नको. म्हणून तिनं मी आठ वर्षांचा असताना मला तिच्या गुरूंकडे - म्हणजे गंगाधरबुवा पिंपळखरे यांच्याकडे - पाठवलं. मला बघून सर म्हणाले, "अगं, हा केवढा लहान आहे. हा काय शिकणार?" मग आई म्हणाली, "तुम्ही ऐका त्याचं गाणं." तेव्हा मी त्यांना ते म्हणून दाखवलं होतं - "देवा सोडा तो पाषाण." (संजीवजींनी आम्हाला चक्क धृपद म्हणून दाखवलं!) मला वाटतं माणिक वर्मांचं गाणं होतं. आणि मी तेव्हाही एवढंच छान गायचो, बरं का? म्हणजे काही लोक माझं लहानपणीचं गाणं ऐकून "अरे, तब भी आप इतना अच्छा गाते थे. बाद में कुछ बढे की नहीं?" असं म्हणतील. (आम्ही सगळे खळखळून हसलो यावर.) तर वाढलं. पण ते काय

वाढलं तर एक रिफाईनमेंट असते, विचार असतो, एक अडवान्समेंट असते, एक मुरलेपण असतं, ते वाढलं. पण मुळात एक "आडात" म्हणतात, ते नक्की होतं माझ्याकडे.

**शास्त्रीय संगीत शिकण्यामागची भूमिका**

मला क्लासिकल शिकायला घालण्यामागे आईचा विचार हा होता की ख्याल गायनामध्ये तुमची क्रिएटीविटी व्यक्त करायला तुम्हाला प्रचंड वाव असतो, एक गायक म्हणून. इतर कुठल्याही फॉर्ममध्ये गायक हा एक इन्स्ट्रुमेण्ट असतो. महत्त्वाचा असेल पण इन्स्ट्रुमेण्ट असतो. आता उपशास्त्रीय संगीतामध्ये आपण म्हणतो - वा वा! काय गायक आहे. ह्या गायकामुळे हे गाणं छान झालं. पण हे अर्धसत्य आहे. ती रचना जो करतो तो संगीतकार असतो; त्याची ती सगळी कल्पना असते. फरारी बनवणारा एक वेगळा असतो आणि फरारी चालवणारा शूमाकर असतो - पण तो ती बनवत नसतो. पण क्लासिकल म्युजिक मध्ये बनवणाराही तोच असतो आणि चालवणाराही तोच असतो. चित्रपटाच्या गाण्यामध्ये किंवा भावगीतं गाताना गायक हा एक महत्त्वाचा इन्स्ट्रुमेण्ट असतो - ती कल्पना सत्यात उतरवण्यासाठी. क्लासिकल मध्ये हे सगळं समाधान त्या गायकालाच मिळतं. तोच क्रिएटर असतो, तोच त्याचा कॅनवास ठरवत असतो. मैफिलीचा दोन तासाचा आवाका कसा भरायचा हे सगळं गायकच ठरवतो. चांगले गाणारे बरेच असतात पण उत्तम मैफिल रंगवणारे कमी असतात. त्याचं कारणच हे असतं की चांगला गाणारा क्लासिकल गायक हा ती भूमिका उत्तम निभावू शकतो पण प्रत्येक क्लासिकल गायक हा दोन तासाचा कॅनवास इमॅजिन करणारा असतोच असं नाही. अनेक भूमिका निभावल्याशिवाय एक क्लासिकल गायक एक उत्तम मैफिल गायक म्हणून नावाजला जाऊ शकत नाही. त्याचं सगळं कसब पणाला लागतं क्लासिकल म्युजिक मध्ये. माझे खूप कंटेम्परी होते ज्यांचं खूप कौतुक व्हायचं नाट्यसंगीतामुळे त्या वेळेला. आई मला सांगायची, "हे बघ, संजीव, तुझं उद्दिष्ट लॉंग टर्म आहे. तुला वेळ लागेल जे करायचंय त्यासाठी. पण जेव्हा ते घडेल, तो जो आनंद असेल किंवा ते जे क्रिएटिव satisfaction असेल त्याची तुलना कशाशीच होऊ शकत नाही. त्यामुळे आत्ता आपण शॉर्ट टर्म काहीच बघायचं नाही. म्हणून तू नाट्यगीतं शिकून ती गायची नाहीत

कारण ती लोकांना पटकन माहिती असतात." ही विचारधारा पण मला तेव्हापासून आई बाबांनी दिली.

**लहान वयातलं यश**

मी चाइल्ड प्रॉडेजी होतो - तुम्ही माझ्या वेबसाईट वर माझं गाणं ऐकू शकता मी तेरा वर्षांचा असताना मैफिल करायचो ते (http://www.sanjeevabhyankar.com/classical-music.html). तर ते गाणं हिराबाई बडोदेकरांनी ऐकलं. त्यांनी तीन वेळा माझं गाणं त्यांच्या घरी केलं, आवाज बदलायच्या आधी, १२-१३-१४ ही तीन वर्षं. पु.लं.नी ऐकलं, खूप बोलले पु.लं. त्याच्यावरती. भीमसेनजींनी ऐकलं. ते म्हणाले की हा ज्ञानेश्वरांच्या कुळातला मुलगा आहे. गंगुबाई हनगळांनी पुंगोळला मला सवाई गंधर्व महोत्सवात गायला बोलावलं, १२ वर्षांचा असताना. वसंतराव देशपांड्यांनी ऐकलं, दोन वेळा. घरी बोलावून सांगितलं की हा गाण्यासाठीच जन्मलाय, ह्याला पूर्ण वेळ गाणंच करू द्या. हिराबाईंनीही सांगितलं की ह्याला पूर्ण वेळ गाणंच करू द्या, दुसरं काही करू देऊ नका. इतकं काय काय घडलं.



**गुरुजींच्या गुरुकुलात प्रवेश**

ह्या सगळ्या पार्श्वभूमीवर जेव्हा गुरुजींनी माझ्या गाण्याचं कौतुक ऐकलं - आई शिकायला लागली होती त्यांच्याकडे पण त्यांना काही बोलली नव्हती पण त्यांना बाहेरून कौतुक कळलं. ते म्हणाले, "शोभा, सुना है तुम्हारा लडका बहोत धुँवाधार गाता है।" तेव्हा आई-बाबांनी ठरवलं होतं की फक्त आणि फक्त गुरुजी - म्हणजे पंडित जसराजजी - म्हणाले मी ह्याला शिकवतो तरच मी पूर्ण वेळ गाणं करणार. कारण त्यांचं जे इस्थेटिक्स आहे गाण्याचं, संगीताकडे

बघायची दृष्टी - ती माझी जी संगीताकडे बघायची जन्मजात दृष्टी होती तिच्याशी जुळते असं आईचं ठाम मत होतं. गुरुजींनी गाणं ऐकलं - ही १९८३ सालची गोष्ट. मला १३ पूर्ण, १४वं सुरु होतं. गुरुजी म्हणाले, "अगर मेरे पास आना है तो अभी डिसाइड करना पडेगा आप को। तो पूर्ण वेळ गायक बनणार असेल तरच मी शिकवू शकतो. आणि मी कुठेही जाईन तिथे त्याला यायला लागेल बरोबर. कारण मी सारखा फिरत असतो आणि तो माझ्याबरोबर आला तरच त्याला शिकायला मिळेल." तोपर्यंत आई बाबांनी असं ठरवलं होतं की ते म्हणाले तर हो म्हणायचं. त्यामुळे मी नववीत असतानाच माझं फुल टाइम करिअर म्युझिक मध्ये ठरलं. आणि मी टिक मार्क म्हणून बी कॉम केलं. माझी बायको आर्किटेक्ट आहे. ती म्हणते - तू बी कॉम नसता झालास तर नसतं केलं हं लग्न! (संजीवजी हलक्या फुलक्या विनोदानी गप्पांमध्ये आपल्याला हसवत ठेवतात.) तर थोडक्यात माझी मानसिकता फुल टाइम म्युजिशिअनची तेव्हापासूनच बनली.

**आपण शिक्षणाविषयी बोलतो आहोत तर त्यासंबंधीच पुढचा प्रश्न आहे. तुम्ही म्हणालात की १९८३ साली पहिल्यांदा तुमचं गाणं ऐकलं गुरुजींनी. तर त्या वेळचं संगीत शिक्षण आणि आताचं यात फरक आहे का आणि असेल तर काय फरक पडला?**

: हो, फरक आहे ना. खूप आहे. मुळात कलावंतांच्या कन्सेप्ट्स मध्ये पण फरक होता.

**सहवासाचं तत्त्व**

आता माझे गुरुजी ८६ वर्षांचे आहेत. त्यांनी बघितलेला काळ हा त्याच्याही मागचा. त्यामुळे त्यांचं दृढ मत होतं की "मेरे पास ही रहना है।" माझ्याबरोबर प्रवास सुद्धा केला पाहिजे. मला तू नजरेसमोर पाहिजेस, तू तुझा रियाज करत रहा आणि मला हवं तेंव्हा मी तुला शिकवेन. तानपुऱ्यावर बस म्हटलं की बसायचं. तेंव्हा मला कंटाळा आलाय वगैरे काही चालणार नाही. पण ही त्यांची रिक्वायरमेंट होती, हा मला चॉईस नव्हता. मी त्यांच्याकडे असताना त्या दहा वर्षात एकदाही कधी कशाला नाही म्हटलो नाही. अमुक ठिकाणी या तारखेला पोच म्हटल्यावर आयत्या

वेळी मिळेल त्या रेलवेच्या तिकिटावर तीस-चाळीस तास सेकंड क्लासनी प्रवास केलाय, मुंबईहून वाराणसी, हरिद्वारसारख्या अनेक ठिकाणी अनरिजर्व्ड क्लासमध्ये बसून प्रवास केलाय. काहीही असो, गुरुजींना नाही म्हणायचं नाही. माझ्यात हिंमतच नव्हती त्यांना नाही म्हणायची. तो काळच एवढा वेगळा होता. फुल टाईम म्युजिशन तुम्हाला व्हायचं आहे आणि जसराजजी म्हणाले की माझ्या शिस्तीत तुम्हाला वागायचं नसेल तर जा निघून, तर कसं चालेल?

रात्री झोपताना गुरूंचे पाय चेपायचे हे म्हणजे काही विशेष करणं नव्हतंच. किंवा मैफिलीच्या आधी त्यांच्या धोतराला इस्त्री करून द्यायचो. नीट नाही झाली तर ते म्हणायचे 'चलो हटो, मैं करता हूँ।' त्यामुळे त्यात खूप काम करायला लावलं असा निगेटिव्ह भाव वगैरे काही नव्हता. हा त्यांच्या सिस्टीमचा किंवा प्रोसेसचा भाग होता. मुळात या सगळ्यामागे तत्त्व हे होतं की सहवास मिळाला पाहिजे. हे तत्त्व अजूनही लागू आहे. कारण त्या सहवासातून टिप्स मिळतात. खूप शिकायला मिळतं. जे तुम्ही आठवड्यातून दोन दिवस जाऊन शिकता त्यापेक्षा या ८-१० वर्षांच्या सहवासातून अडव्हांस लर्निंग मिळतं.

**नेट प्रॅक्टिस आणि मॅच प्रॅक्टिस**

मी त्यांना ४०० मैफिलींना स्वर-साथ केली आहे. म्हणजे एवढे लाइव्ह प्रोग्रॅम ऐकले मी त्यांचे. नेट प्रॅक्टिस एक प्रकार असतो पण ज्याला मॅचेस खेळायच्या आहेत त्याला मॅच प्रॅक्टिस पण लागते. अश्या दृष्टीतून परफॉर्मिंग गुरूचा सहवास मिळणं फार महत्वाचं आहे. म्हणजे नॉन स्ट्रायकर एंड वरून तेंडूलकरची बॅटिंग बघायला मिळण्यासारखं आहे.

काळानुरूप गुरूंच्या कन्सेप्ट्स सुद्धा बदलतात. मी ही आता शिकवायला सुरुवात केली आहे त्या माझ्या शिष्यांना नेहेमी सांगतो की माझ्या मैफिली तुम्ही ऐका. बारीक बारीक इतकी मॉडिफिकेशन्स, अड्जस्टमेंट्स असतात. मंडपाचा - तिथल्या टेम्परामेंटचा अंदाज असतो, त्यानुसार मैफिलीचे टप्पे कसे गाठले जातात, भावविश्व कसं उभारलं जातं, रागाची निवड, राग क्लायमॅक्सला कसा आणला जातो - हे बघा. शेअर बाजारासारखी मैफिल खाली - वर नाही

जाऊन चालत. वन डे क्रिकेट मधल्या ४०० रनच्या इंनिंग सारखी ती चढत चढत जायला पाहिजे. हे सगळं शिकायला मैफिली ऐकल्या पाहिजेत. आता आपल्यासारख्या या पुढच्या पिढीला प्रायव्हसी पण हवी असते, त्यामुळे कायमच घरात नको वाटतं. म्हणून पारंपरिक गुरुकुल पद्धतीनी शिकवणं मी नाही प्रेफर करत पण सहवासाचं तत्त्व अजून लागू आहे ते मगाशी म्हटलं तसं मैफिलींच्या तऱ्हेने जोपासलं जातं.



**छोट्या सूचना महत्त्वाच्या**

दुसरं म्हणजे गुरूंच्या छोट्या छोट्या बोलण्यातून टिप्स मिळतात. मी १३ वर्षांचा असताना भीमसेनजी म्हणाले होते की हा ज्ञानेश्वरांच्या कुळाचा मुलगा आहे पण दुसरं अजून मी एक सांगीन की याने आपल्या तब्येतीकडे लक्ष द्यावं. त्यांच्या म्हणण्याचा अर्थ मला आत्ता नीट समजतो की तब्येत उत्तम असणं किती महत्त्वाचं आहे. मांडी घालून तीन-चार तास बसता आलं पाहिजे. ऑफिसमध्ये कसा वरचा माणूस फक्त निर्णय घेतो आणि टीम मधल्या बाकीच्यांना कामं देतो. परफॉर्मिंग आर्टिस्टला आणि त्यातून क्लासिकल गाणाऱ्याला तसं नाही करता येत. स्वतःच तीन-तीन तास मैफिलीत बसून गावं लागतं, स्वतःच्या ताकदीवर मैफिल रंगवावी लागते आणि त्यासाठी त्याचा फिटनेस फार महत्वाचा आहे. अनुभवसंपन्न गुरुचं एक एक वाक्य किती महत्त्वाचं असतं हे तुम्हाला कळेल यावरून.

**शास्त्रीय संगीत हा एक शोध, एक सततचं इनोवेशन**

क्लासिकल म्युजिक हे पूर्णपणे कधीच शिकता येत नाही कारण तो एक शोध आहे. प्रत्येक जण आपापल्या गाण्यातून त्याचा शोध घेत असतो. काहींना नवीन काही तरी मिळतं, काहींची पुनर्रचना असते. पण ती त्या त्या वेळी नक्की कशी घडणार आहे हे त्याला सुद्धा माहित नसतं. रंगांच्या दुनियेसारखंच आहे हे. सात रंग आहेत तेच आहेत पण त्यांच्यातून अमर्याद शक्यता

निर्माण होऊ शकतात. वेगवेगळे रंग मिसळून नवीन काही तरी सुंदर मिळतं किंवा एकाच हिरव्या रंगाच्या निसर्गात आपण हजारो वेगळ्या छटा बघतो. तसंच स्वरांचं पण आहे. मला ख्याल गायन सुरु करून ३८ वर्षं झाली. मग मी एखादा बागेश्री गाताना त्याच्यामध्ये आजही मला चार वेगवेगळ्या स्वरसंगती सापडतात, चाळीस मिनिटांमध्ये, which is really very difficult. एवढया वर्षांची तपस्या झाल्यानंतरही चार गोष्टी वेगळ्या मिळतात. म्हणजे हे जे विषय आहेत त्यांच्यामध्ये ह्या शक्यता आहेत, हा एक part झाला. काही नवीन बंदिशी तयार केल्या, डीवोश्नल गीतांसाठी क्लासिकल म्युजिकच्या रागाधारित अशी कम्पोजिशन्स तयार करणं, हा त्यातला इनोवेशनचा दुसरा part आहे. क्लासिकलमध्ये इनोवेशन म्हणजे रागाच्या चौकटीमध्येच मिळणाऱ्या ज्या स्वरांच्या उत्कट अश्या कलाकृती असतात त्यांनी एक वेगळंच चित्र उभं राहत की जे आधी कधीच घडलेलं नसतं. त्यामुळे हा सौंदर्याचा शोध सगळा शिकून संपला असं कधीच होत नाही. शिकण्याच्या प्रोसेसमध्ये या अमर्यादत्वाचा अनुभव पण येतो. गुरुसुद्धा कधी 'मेरा हो गया, अब तुम सीखो' असं म्हणत नाहीत कारण ते पण शेवटपर्यंत शिकतच असतात.

ही सगळी तत्त्वं अजूनही लागू आहेत, काही पद्धती कदाचित बदलल्या असतील.

**"संगीत ही बिनशब्दांची जागतिक भाषा आहे" याचा प्रत्यय देणारे काही अनुभव तुमच्या प्रवासाच्या निमित्ताने कधी आले का?**

: **क्लासिकल हे स्वरप्रधान, म्हणूनच वैश्विक संगीत**

हो, नक्कीच. मुळात क्लासिकल हे स्वरप्रधान संगीत आहे. आम्ही रसिकांच्या समोर स्वर-रचनांचा कॅनवास उभा करत असतो आणि त्याला पूरक अश्या शब्दांची जोड अश्या पद्धतीने आम्ही गात असतो. त्यामुळे भाषेचा बॅरिअर फारसा येत नाही. पण एखाद्या संपूर्ण परदेशी ऑडियंस समोर मराठी भावगीत किंवा चित्रपट गीत गायला लागलं तर त्यांना ते अजिबात रिलेट करता येणार नाही. क्लासिकल मध्ये पूर्णपणे स्वरांमुळे फुलणारे भाव आहेत. स्वरांनी घातलेली

साद आणि त्याला अर्थपूर्ण, भाववाही शब्दांचा सपोर्ट म्हणजे क्लासिकल म्युझिक आणि त्यातलं ख्याल - गायन. पण म्हणून ती साद सगळ्यांनाच कळते असं नाही. काहींना हिऱ्याची किंमत कळत नाही आणि सोन्याचे दागिने घालणारे लोक त्यांना जास्त श्रीमंत वाटतात. तसंच रसिकांमध्येही उत्तम स्वर-पारखी काही असतात, काही नसतात. पण तरी शब्दप्रधान संगीतापेक्षा शास्त्रीय संगीताच्या मैफिली ह्या भाषेचा अडसर नसल्यामुळे काना-कोपऱ्यात होतात. कारण ही एक यूनिवर्सल लँग्वेज आहे. स्वित्झर्लंड किंवा अमेरिकेतल्या पूर्ण गोऱ्या ऑडियंसला मी अगदी हलका भाव जरी सांगितला की "मी आता पहिल्या भागात विरहाची बंदिश गाणार आहे आणि दुसऱ्या भागात मीलनाची." मग स्वरांमधून ते भावविश्व उभं राहतं की नाही ते त्यांना समजतं. भावनिर्मितीसाठी स्वर महत्त्वाचे आहेत आणि शब्द हे सपोर्टला असल्यामुळे ते बोनस आहेत. त्यामुळे ख्याल-गायनाला 'वसुधैव कुटुंबकम' ही आपल्या अंकाची थीम अगदीच लागू पडते असं मी म्हणेन. माझ्या मते गाणं जेवढं स्वर-प्रधान होत जातं तेवढं ते व्यापक होत जातं.



मैफिलीनंतर रसिकांच्या प्रतिक्रिया ऐकल्या - "we were in trance, we were in a different world" - की याचा प्रत्यय येतो. काही वेस्टर्न रसिक अगदी मोक्याच्या ठिकाणी दाद देऊन गाणं

ऐकताना पाहिलं की जाणवतं की रसिकतेमध्ये भाषा, जात, देश, ओरिजिन हे अडसर येत नाहीत. ज्यांच्यावर ऐकायचे संस्कार झालेत असे, म्हणजे ज्यांना क्लासिकल गाणं ऐकायची सवय आहे, त्यांचं मैफिलीत दाद देणं पण वेगळं असतं पण त्यासाठी तो माणूस भारतीय आहे की परदेशी हे लागू होत नाही. दाद द्यायची पद्धत वेगळी असेल - म्हणजे काही 'वाह' म्हणतील तर काही मान हलवतील. पण त्यांच्या डोळ्यांमधले भाव सारखेच असतील. शरीराने अभिव्यक्त केलेली ही एक दाद आहे. त्याचबरोबर जसा रसिक कलाकाराला ऑब्जर्व करत असतो तसा कलाकार पण रसिकांना ऑब्जर्व करू शकतो आणि मी तर नक्कीच करतो.

**तुम्हाला इतर संगीत प्रणालींचा पण खूप परिचय झाला असेल ना परदेश प्रवासामधे? त्यांच्यात काय साम्य किंवा भेद आहे? किंवा वेस्टर्न क्लासिकल, फ्यूजन किंवा जुगलबंदी अश्यांचा गायकीमध्ये उपयोग होतो का?**

: हो. आता इंटरनेटने केलेल्या रेवोल्युशनचा परिणाम सांगतो मी तुम्हाला.

**आता गाणं कुठेही झटपट पोचू शकतं**

एचएमवीने मला रेकॉर्ड केलं ९१ मधे, तेंव्हा कॅसेट होती. त्यावेळी सीडी पण नव्हती! ही कॅसेट कुठेतरी पोहोचल्याशिवाय तुमचं गाणं पोहोचू शकायचं नाही. म्हणजे एखाद्या पॅरिसमध्ये बसलेल्या व्यक्तीला संजीव अभ्यंकर ह्याच्या गाण्याचं एक्सपोजर हे त्या व्यक्तीचा गाण्याशी संबध असेल तर, ती व्यक्ती मार्केट मध्ये गेली कुठे इंडिया मधे आली तेंव्हा किंवा तिच्या मित्रमैत्रिणी कडे गेली आणि तिथे तो किंवा ती काहीतरी ऐकत आहेत आणि त्यांनी कॅसेट/सीडी दिली की बाबा हे ऐक, this is really good, तरच होऊ शकायचं. पण आता फेसबुकवर जे माझे फ्रेंड पण नाहीयेत त्यातलं कोणीतरी माझं गाणं कुणाला तरी शेअर केलं आणि त्या पॅरिसमधल्या व्यक्तीनं बघितलं आणि मग त्या व्यक्तीला लक्ष्यात आलं की वंडरफुल आहे. म्हणून ती माझ्या साईटवर जाऊन माझं गाणं ऐकू शकते. तिला आवड असेल तसं विकत घेऊ शकते, download करून घेऊ शकते. म्हणजे खऱ्या अर्थाने इंटरनेटने "वसुधैव कुटुंबकम" जे आहे

ते सत्यात उतरवलंय. लंडनमध्ये दोन अफगाणी मुलं आली अशी आपली सहज, विशीची. त्यांनी मला त्यांची सीडी दिली आणि म्हणाली, "Please listen to it and look forward to your program in London. Last time also, we were there when you were there." तर आता हे लोक कुठून कुठून येतात, त्यांच्याकडे माझी सीडी असेल असेही नाही, पण कुठे इंटरनेट मुळे एक्सपोजर असेल. कुणाचंही गाणं कुठेही पोहोचतं, त्यांना आवडही निर्माण होऊ शकते आणि ते लोक लाइव प्रोग्रॅम मध्ये येऊन व्यक्त पण करतात. इंटरनेटने हे रेवोल्युशन आणलेलं आहे. तर हा एक पार्ट झाला.

**पूर्वतयारी एका जागी नसतानाही होऊ शकते**

दुसरा पार्ट मला जाणवतो "वसुधैव कुटुंबकम" या थीम मधला की मी जुगलबंदी पण खूप करतो साऊथ - नॉर्थ मध्ये पण मी खूप केल्या आहेत. फ्लूटबरोबर असेल, वायोलिनबरोबर किंवा वोकल पण खूप केलेल्या आहेत, वेगवेगळ्या ७ - ८ सिंगर्सबरोबर. वेस्टर्नमध्ये लंडनला माझा प्रोग्राम होता - हार्प, पियानो आणि मी. तर सांगायची गंमत अशी की आता हे जे प्रोग्राम असतात त्यांची रिहर्सल कशी करायची? पूर्वी जर चेन्नई ला ड्युएट करायचं असेल तर तीन दिवस आधी जाऊन बसावं लागायचं, उत्तम प्रोग्रॅम द्यायचा असेल तर. स्वतः पं. गुरुजी आणि बालमुरलीकृष्णन ह्यांच्या duet साठी ८७ - ८८ मध्ये चेन्नईला गेलेलो. चार दिवस आम्ही हॉटेलमध्ये राहिलो होतो. बालमुरलीजी चेन्नईचे. गुरुजींना तेंव्हा खोकला वैगरे काहीतरी झाला होता, तर ते मला म्हणाले की "तुम जाओ और सीख के आओ जो गाना है" आणि मला रूममध्ये गाऊन दाखवत राहा. बालमुरलीजी मला स्वर शिकवत होते आणि मग मी रूम मध्ये येऊन गुरुजींना गाऊन दाखवायचो. ते पेपर वाचत आहेत, कॉफी पीत आहेत आणि म्हणायचे की "गाते रहो तुम" आणि मग त्या दोघांचे duet झालं आणि मी तंबोऱ्यावर. पण आता हे किती सोपं झालंय की Skype वर आम्ही रिहर्सल करू शकतो. म्हणजे मी इथे बसलेलो आहे, तो जो वादक आहे तो एखादवेळेस त्याच्या शहरात पण नसतो. तो सिंगापूर मध्ये बसून पण मी रिहर्सल केलेली आहे. तर तो त्याच्या iPhone वरून आणि मी माझ्या इथून, आणि प्रोग्राम होणार चेन्नईला. पण मग फक्त

आम्ही चेन्नई मध्ये जेव्हा भेटतो तेंव्हा आदल्या दिवशी एका रिहर्सलमध्ये पण आमचं काम होऊ शकतं, फुल अंड फायनल. सगळी पूर्वतयारी आम्ही इंटरनेट वर करून, एक्स्चेंज ऑफ थॉटस - काय काय घ्यायचं, काय काय त्याचे पर्याय आहेत, हे आधी इमेल / वॉट्सअप वर होऊ शकतं, चर्चा होऊ शकते, वेरिअस ऑप्शन्स! कमाल झालेली आहे म्हणजे! लिटरली "वसुधैव कुटुंबकम" झालं आहे.

**वेगवेगळ्या सौंदर्यदृष्टींचे नकळत प्रभाव**

आणि मग वेगवेगळ्या गायकीचं तुम्ही विचारलं, तर मी जसा म्हणतो की इस्थेटिक प्रभाव पडत राहतात एकमेकांवर, डायरेक्ट इन्कॉर्पोरेशन नसतं. म्हणजे वेस्टर्न म्यूजिक जर मी ऐकलं तर ते मला परदेशात जाऊनच ऐकायला लागत नाही. हीच तर गंमत झाली आहे आता. मी इकडे पुण्यात बसून, सगळ्या जगातलं music ऐकू शकतो. जगात घडलेल्या काही events लोक फेसबुकवर शेअर करतात, यूट्यूबवर असतं. कोणी काय केलंय याची खबरबात, प्रवास करता करता एअरपोर्ट वर बसूनही माणसाला घेता येते आणि त्यातून ती इस्थेटिक प्रोसेस स्वतःची ग्रोथ घडवून आणते. वेस्टर्नचे डायरेक्ट अप्लिकेशन मला माझ्या ख्याल गायकीमध्ये किंवा त्यांना त्यांच्या गाण्यामध्ये करायची संधी मिळते असं नाहीये. पण एकमेकांच्या चांगल्या गोष्टीपण आपण उचलू शकतो. त्यातून एक वेगळ्या प्रकारचे इन्स्पिरेशन निश्चितपणे मिळते. आणि ते बेमालूमपणे तुमच्या संगीतामध्ये प्रभाव पाडून जाते, नोन - अननोन, दोन्ही पध्दतीनी.

**संजीव जी, तुम्ही तयार केलेल्या काही बंदिशी तुमच्या वेबसाईट वर पण ठेवलेल्या आहेत. त्याविषयी काही सांगाल का? पूर्वीच्या शास्त्रीय संगीताच्या संकल्पनेप्रमाणे घराण्याची गायकी प्रत्यक्ष गुरु-शिष्य परंपरेतून पुढे जायची. त्या पार्श्वभूमीवर हे ट्रान्सफॉर्मेशन आहे ना? इंटरनेटवर नवीन कम्पोजिशन्स सगळ्यांसाठी उपलब्ध करून देणे, ह्या मागचा तुमचा विचार काय होता?**

: परंपरेतून येणाऱ्या गोष्टी तर आहेतच ना, ते मी पण गातो. पण माझ्या गुरुजींनी पण कनट्रिब्युट केलं की नाही? त्यांनी पण त्यांच्या गुरूंकडून शिकलेल्या मध्ये स्वतःची पण भर घातली. दोन विचार आहेत यामध्ये.

**स्वनिर्मिती आवश्यक**

त्यातला जो पार्ट १ आहे की याच्या मागचा विचार काय? जसं पुढचा माणूस आपल्याला जे सापडलंय ते कोंदणात बांधून डिस्प्लेमध्ये आणतो. आपण जर एक संग्रहालय जर उभं केलं तर आपण म्हणतो की मेवाती घराण्याच्या दालनामध्ये हे पं. मणीरामजींनी कनट्रिब्युट केलं आहे, हे दालन आहे ते पं. जसराजजींच्या कनट्रिब्युशनचे. तर पुढे गेल्यावर संजीव अभ्यंकर यांच्या कनट्रिब्युशनचे दालन पण तिथे पाहिजे ना? मग ते बंदिशी असोत किंवा मराठी अभंगवाणी. म्हणजे मी गातो त्या प्रांतामध्ये मी करायचा प्रयत्न करतो. क्लासिकलमध्ये सर्व प्रकारचे रस आहेत - शृंगार आहे, भक्ती आहे, करुणा आहे. भक्तीसंगीत हा माझा लाडका जॉन्रा आहे - माझ्या आवाजाला आणि प्रकृतीला सगळ्यात जास्त भावणारा. त्याच्यामध्ये काय? तर मग मराठी अभंग येतात, हिंदी संतांच्या रचना येतात. वेगवेगळे संत निवडले की प्रत्येकाची भाषाशैली वेगळी असते. त्या भाषाशैलीमुळे शब्दांचा एक नाद मिळतो तुम्हाला. राजस्थानी भाषेत मीराबाई गाणं गातात, तुलसीदासांनी लिहिलेलं एखादं अवधी पद असेल, सूरदासांनी लिहिलेलं ब्रज काव्य आहे. मीराबाई कृष्णाला भेटण्याचा आनंद व्यक्त करतात, तुलसीदास रामाला भेटल्याचा आनंद व्यक्त करतात, सूरदास कृष्णाला भेटल्याचा आनंद व्यक्त करतात. ह्यातून येणारं जे वैविध्य आहे ते मी टिपण्याचा प्रयत्न केला आहे. जसं गुरुजींबद्दल आपण म्हणतो की त्यांच्या गुरुंनी त्यांना अमुक दिलं, त्यांनी मला तमुक दिलं. ते माझ्याकडे आहेच; ते उत्तम आहे, ते जतन करायचंच. पण त्याच्या व्यतिरिक्त मला असं वाटलं की हे नाहीये माझ्याकडे. मग या पद्धती करायच्या ना तर माझ्या माझ्याच तयार करतो. मी दुसऱ्याकडून कशाला घेऊ?

**निर्मिती रसिकांपर्यंत पोचवणंही आवश्यक**

आता तुमचा दुसरा मुद्दा की मी वेबसाईट वर बंदिशी का ठेवल्या? त्या जास्तीत जास्त लोकांनी ऐकल्या तर मला आनंद आहे ना? ती निर्मिती पोहोचण्याचा काळ शॉर्टन करायचा माझा विचार होता. मला माझी निर्मिती जर पोहोचवायची असेल तर website was best way. आणि आज काल खूप वेळा एक आक्षेप असतो ना की लोकं बालगंधर्वांची नाट्यगीतं गातात, भीमसेनजींचे अभंग गातात, अभिषेकींची, वसंतरावांची पदं ऐकायला मिळतात. पण पुढच्या पिढीने जर स्वतःचीच पदं निर्माण करून पॉप्युलर केली नाहीत, तर २५ वर्षांनंतरही लोकं हीच पदं गाणार. मधल्या पिढीने काय केलं? तर मला असं वाटत की मधल्या पिढीने जर स्वतःचे काम निर्माण केलं असेल तर ते पोहोचवायचा प्रयत्न केला आहे का? म्हणजे असं नाही मला म्हणायचं की मी एकटाच निर्मिती करतोय, पण निर्माण करणाऱ्याने निर्माण केले तर ते पोहोचवायला पण पाहिजे.

**याच note वर आता शेवटच्या प्रश्नाकडे आता येऊन पोहोचलो आहोत की असं तुमचं एखादं स्वप्न आहे का की जे पूर्ण झालं म्हणजे सारं मिळालं?**

**: अपूर्णत्त्वामुळे प्रतिभा जिवंत राहते**

संत रामदास स्वामींचा मी आख्खा दासबोध गायलो आहे महाराष्ट्र गवर्न्मेण्टसाठी. त्यांच्या वेबसाईटवर पूर्ण दासबोध फ्री डाऊनलोड ठेवला आहे त्यांनी. तेंव्हा रामदास स्वामींनी काय सांगितलं आहे ते गाता गाता मलाही थोडं अभ्यासायला मिळालं. त्यात एक छान वाक्य होतं की आयुष्य हे अपूर्ण आहे, हे तुम्ही समजून घ्या. त्याला पूर्णत्व द्यायचा प्रयत्न करू नका. त्यामुळे कुठल्याही टप्प्यावर गेलात तरी हे अपूर्णत्व तुम्हांला जाणवतच जाणार आहे. हे माझं मत दृढ आहे की असा कुठला टप्पा असूच शकत नाही की मला सगळं मिळालं. तिथे गेल्यावर मला काहीतरी पुढंचच दिसायला लागतं. मला असं वाटत की ते जिवंत प्रतिभेचे लक्षण आहे. ती अमर्यादता जपायचा असा माझा प्रयत्न असतो.

संजीवजी, thank you so much. आम्हाला आणखी बऱ्याच गप्पा तुमच्याशी मारायला आवडल्या असत्या, पण आता तुमचा किती वेळ घ्यायचा हाही प्रश्न आहे. पण ज्या मुक्तपणे तुम्ही गप्पा मारल्यात आणि ज्या वेगवेगळ्या विषयांना तुम्ही स्पर्श केलात, त्यातून खूप ऐकायला, शिकायला मिळालं. आणि मला अगदी खात्री आहे की आमच्या सगळ्या वाचकांना सुद्धा ही मुलाखत नक्की आवडेल.



*अशा रीतीनं मोहवून टाकणाऱ्या मधाळ आवाजात मधेच काही गुणगुणत, विनोद करत, चपखल उदाहरणं देत संजीवजींनी त्यांच्या सांगीतिक कारकीर्दीविषयी आमच्याशी मनमुराद गप्पा मारल्या. यशोवर्धन जोशीला हा योग साधून आणल्याबद्दल खूप धन्यवाद! संजीवजी ऑगस्ट मध्ये सिंगापुरात एका मैफिलीसाठी येत आहेत. शास्त्रीय संगीताच्या चाहत्यांकरता ही मोठीच पर्वणी असणार आहे. त्याकडे नक्की लक्ष ठेवा.*

# असे देखिले सिंगापूर

आठविल्या ओळी बघता सिंगापूर|
“जीवन मे एक बार आना सिंगापूर”||
जे खचित भासे सौंदर्यापूर |
बघून आनंद मिळे भरपूर ||
असे सुंदर सिंगापूर||१||

इथे सुस्थळांचे बहुत पसारे|
बघुनि मनमोरांचे फुलती पिसारे ||
वाटे पर्यावरण बहु हासरे|
असे आल्हादक हवा भरपूर||
असे रम्य ते सिंगापूर ||२||

वसुंधरेची इथे विविधता|
बघता नयनी वाटे प्रसन्नता||
तरुवेलींची इथे विपुलता|
जलचरांच्या प्रजाती बघा भरपूर||
असे हिरवे हिरवे ते सिंगापूर||३||

नीटनेटके पेहेराव ललनांचे|
वाटे अवतरले तारकागण नभीचे||
कुठुनी येती कुठे लोपती?|
भासे एक सारखा नूर||
असे लोभस ते सिंगापूर||४||



इथे रुजली मॉल संस्कृती |
अबब वस्तूंचे प्रकार ते किती ||
खाद्य पेय पदार्थ ते किती |
अवश्य करावी खरेदी भरपूर ||
असे समृद्ध सिंगापूर ||५||

MRT ची गम्मत न्यारी |
वर्णावी तिची सेवा खरी ||
सेवेत तिच्या सदैव खबरदारी |
जरी तिला नाही इंजिन नाही धूर |
असे टापटीप सिंगापूर ||६||

जल, विद्युल्लतेची असे अखंडता |
आणि नांदते सदैव शांतता ||
भावली इथली स्वच्छ ऋजुता |
पर्यटकांचा इथे सदैव पूर ||
असे प्रेक्षणीय सिंगापूर ||७||


नियमांसाठी असे जागृती |
वाहनचालक नियम पाळिती ||
स्वास्थ्यासाठी सतर्कता अति |
समाज जीवन असे सुमधुर ||
असे आदर्श सिंगापूर ||८||

*सौ. शैलजा सोनगावकर*



# परिवार वार्ता

डॉ नीतीन मोरे यांचा उन्मेष प्रकाशनाने छापलेला "एकलकोंड्याचा कबिला" हा पहिला काव्यसंग्रह १५ मे ला पुण्यात प्रकाशित झाला. प्रकाशनाला ज्येष्ठ समीक्षक डॉ रमेश धोंगडे, अभिनेत्री सौ मानसी मागीकर आणि प्रकाशिका मेधा राजहंस हे मान्यवर उपस्थित होते. "नीतीन मोऱ्यांची कविता ही भावकविता आणि विचारकवितेच्या सीमारेषेवर उभी आहे. तिचा प्रवास पुढे विचार कवितेच्या दिशेनी व्हावा" अशी इच्छा डॉ धोंगडे यांनी प्रकट केली. "खूप दिवसांनी चांगल्या कविता वाचायला मिळाल्याचा आनंद ह्या कवितांनी मिळेल" असा आशावाद मेधा राजहंस यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात मानसी मागीकर आणि नीतीन मोरे यांनी काही कवितांचं वाचन तर गायिका मधुरा दातार हिनं जितेंद्र कुलकर्णी यांनी काव्यसंग्रहातल्या काही कवितांची केलेली गाणी सादर केली. "एकलकोंड्याचा कबिला" वर आणखी माहिती या फेसबुक पेजवर उपलब्ध आहे.




www.facebook.com/ekalkondyachakabila